म. ग्रं. सं. ठाणें

विषय

[illegible]

हाक्रय क्रमांक

लेखक [illegible]

पुस्तकाचें नांव [illegible]

सन

903

णं

# कहाण्या.

## भाग पहिला.

हें पुस्तक,

**विष्णु दिनकर वैद्य कल्याणकर**

ह्यांनीं केलें.

तें,

मुंबईंत

जावजी दादाजी यांनीं आपल्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८८५.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत ३ आणे.

D. N. Gandil.

# प्रस्तावना.

कहाण्या हें नांव ऐकल्याबरोबर, ह्या बायकांच्या ह्मणण्यांतल्या चिमणी कावळ्यांच्या गोष्टींसारख्या गोष्टी असतील असें कोणास वाटेल पण तसें नव्हे. ह्यांतील बहुतेक कहाण्या भविष्योत्तर पुराण, पद्मपुराण, श्रावणमाहात्म्य, व्रतराज, इत्यादिकांतल्या निवडक निवडक कथाच आहेत. ह्यांतील तात्पर्यें फार उत्तम आहेत, कित्येकांत नीति दाखविली आहे, कित्येकांत ईश्वराची भक्ति करावी; असा बोध आहे. कित्येकांत ईश्वरभक्ति केल्याचें सत्फल दाखविलें आहे, व कित्येक कथा फारच मनोरंजक आहेत, ह्यांत विशेष हें कीं, ह्यांची रचना पुराणाला जाणाऱ्या भोळ्या भाविक बायकांनीं केली असून सासुसूना मायलेकी, त्यांच्या परंपरेनें आजपर्यंत त्या चालत आहेत. ह्यांच्या रक्षणाची स्त्रियांनीं एक पसंत युक्ति काढली आहे. ती अशी कीं, त्या त्या व्रताच्या दिवशीं व्रत करणाऱ्या बाईनें ती ती कहाणी ऐकल्यावांचून उपयोगच नाहीं; ज्या बाईला कहाणी येत असेल तिच्या घरीं जाऊन ती ऐकावी लागते. एखादे गावांत कहाणी सांगणारी कोणी बाई नसली तर फार अडचण पडते, ती ह्या पुस्तकापासून दूर होईल. हल्लीं स्त्रीशिक्षणाचा क्रम झपाट्यानें चालला

असल्यामुळें त्यांतील नवशिक्या मुलींस, ह्यांतील ओ-
ळखीचे शब्द आनंद देतील. ज्यांना वाचतां येत नाहीं
अशा स्त्रियांस कहाण्या वाचून दाखविण्याची विशेष हौस
वाटून त्यांस वांचण्याची गोडी लागेल; यांतील कथा
मूळ कथेहून संक्षिप्त असून चटकदार आहेत. हीं पुस्तकें
विशेषेकरून मुलींना वाचण्याच्या उपयोगीं पडावीं
असा माझा हेतु आहे, या पुस्तकापासून थोडाबहुत सर्व
स्त्रियांस फायदा होणार आहे.

ह्या पुस्तकांत कहाण्यांची सांप्रतची स्त्रीभाषा आहे.
आमचा हेतु ही शुद्ध करण्याविषयींचा होता, परंतु प-
हिल्या भागाची तर आहे तीच असूं द्या; ह्मणजे कहा-
णीच्या मूळ स्वरूपांत बदल होणार नाहीं. असें कि-
त्येक मित्रांनीं सुचविल्यावरून मूळभाषाच ह्यांत काईम
ठेविली आहे.

मु० कल्याण ता० १५ आगष्ट १८८५.

पुस्तक कर्ता.

# अनुक्रमणिका.


| | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | कहाणी | गणपतीची. .... .... .... | १ |
| २ | ,, | आदित्यराणूबाईची. .... .... | २ |
| ३ | ,, | सोमवाराची ( साधी ). .... | १० |
| ४ | ,, | ,, ( खुलभर दुधाची ). .... | १२ |
| ५ | ,, | ,, ( शिवामुठीची ). .... | १४ |
| ६ | ,, | ,, ( फसकीची ). .... .... | १७ |
| ७ | ,, | मंगळागौरीची. .... .... | १८ |
| ८ | ,, | बुधबृहस्पतीची. .... .... | २३ |
| ९ | ,, | शुक्रवाराची ( जिवत्यांची ). .... | २५ |
| १० | ,, | शनिवाराची ( मारुतीची ). .... | २९ |
| ११ | ,, | पांचादेवांची. .... .... .... | ३० |
| १२ | ,, | धरित्रीची. .... .... .... | ३२ |
| १३ | ,, | गोपद्मांची. .... .... .... | ३४ |
| १४ | ,, | शिळासप्तमीची. .... .... | ३५ |
| १५ | ,, | नागपंचमीची. .... .... | ३७ |
| १६ | ,, | दिव्यांच्या अमावास्येची. .... | ३९ |
| १७ | ,, | विष्णूची. .... .... .... | ४१ |

# कहाण्या.

## भाग पहिला.

### गणपतीची कहाणी.



ऐका परमेश्वरा, गणेशा तुझी कहाणी. निर्मळ मळे, उदकाचें तळें, बेलाचा वृक्ष सुवर्णाचीं कमळें, विनायकाचीं देवळें रावळें, मनचा गणेश मनीं वसावा, हा वसा कधीं घ्यावा? श्रावण्या चौथीं घ्यावा, माहीचौथीं संपूर्ण करावा. संपूर्णाला काय करावं? पशापायलीचं पीठ कांडावं, अठ्ठा लाडू करावे; सहा देवाला द्यावे, सहा ब्राह्मणाला द्यावे, सहांचं सहकुटुंबीं भोजन करावं. अल्पदान महापुण्य, असा गणराज मनीं ध्याइजे, मनीं पाविजे, चिंतिलें लाभिजे, मनकामना निर्विघ्न कार्यसिद्धि करीजे,

ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.
( संपूर्ण. )

टीप -ही कहाणी स्नान झाल्यावर गोपद्माची कहाणी ह्मणाव-याच्या पूर्वी बायका ह्मणतात. ही कहाणी घेणारीण बायको सहा दूर्वा नित्य गणपतीला पूजा करून वहाते. ही दूर्वागणपतीच्या व्रताची कहाणी आहे. हें व्रत स्कंदपुराणांत आहे.

## आदित्यराणूबाईची कहाणी.

ऐका आदित्यराणूबाई तुमची कहाणी. आटपाट नगर होतं, त्या नगरांत एक ब्राह्मण होता. तो नित्य समिधा, दूर्वा, आणावयास रानांत जात असे. तिथं नागकन्या, देवकन्या वसा वसत होत्या, काय ग बायांनो वसा वसतां? तो मला सांगा. तुला रे वसा कशास व्हावा? उतशिल मातशिल, घेतला वसा टाकून देशील, उतत नाहीं, मातत नाहीं, घेतला वसा टाकीत नाहीं. तेव्हां त्या ह्मणाल्या; श्रावणमास येईल. पहिल्या आदितवारीं मुकाम्यानें (मोन्या) उठावें, सचीळ[1] स्नान करावें, अग्रोदक पाणी आणावें, विड्याच्या (नागवेलीच्या) पानावर रक्तचंदनाची आदित्यराणूबाई काढावी, सहा रेघांचं मंडळ करावं, सहा सुतांचा तांतू करावा, त्यास सहा गांठी द्याव्या, पानफूल वहावें, पूजा करावी, पानांचा विडा, फुलांचा झेला, दशांगाचा धूप, गुळाखोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा, सहा मास चाळावी, सहा मास पाळावी, माघी रथसप्तमी संपूर्ण करावं. संपूर्णास काय करावं? गुळाच्या पोळ्या, बोटव्यांची खीर, लोणकढें तूप, मेहूण जेऊं सांगावं, असेल तर चीरचोळी द्यावी, नसेल तर जो-

---

1 वस्त्रासहित.

डगळसरी द्यावी, नसेल तर दोन पैसे दक्षणा द्यावी, आणि आपल्या वशाचं उद्यापन करावं. असा वसा ब्राह्मणानें केला, त्याला सूर्यनारायण प्रसन्न झाला, भाग्य लक्ष्मी आली, तेव्हां राजाचे राणीनें ब्राह्मणास बोलवूं धाडलंन, ब्राह्मण जाते वेळेस भिऊं लागला, कांपूं लागला, तेव्हां राजाचे राणीनें सांगितलें कीं, भिऊं नका, कांपूं नका, तुमच्या मुली आमचे येथें द्या. आमच्या मुली गरीबाच्या, तुमच्या घरीं कशा द्याव्या? दासी कराल, बटकी कराल, दासी करीत नाहीं, बटकी करीत नाहीं, राजाची राणी करूं, प्रधानाची राणी करूं, मार्गेश्वराचा महिना आला, ब्राह्मणानें लगीन करून मुली दिल्या. एक राजाचे घरीं दिली, दुसरी प्रधानाचे घरीं दिली. गेल्यापावलीं मुलींचा समाचार घेतला नाहीं, बारा वर्षांनीं समाचारास ब्राह्मण निघाला, राजाच्या घरीं गेला, लेंकीनें बसावयास पाट दिला, पाय धुवायाला पाणी दिलं, बाबा, बाबा, गूळ खा, पाणी प्या, गूळ खात नाहीं, पाणी पीत नाहीं, माझी कहाणी करावयाची आहे, ती तूं ऐक. तुझी कहाणी ऐकावयाला मला कांहीं वेळ नाहीं; राजा पारधीला जाणार आहे, त्याला जेवायला उशीर होईल. तोंच त्याचे मनांत राग आला, तेथून निघाला, प्रधानाच्या घरीं गेला, तिनें पाहिलं आपला बाप आला ह्मणून बसायाला पाट दिला, पाय धुवायाला पाणी दिलं बाबा, बाबा, गुळ खा, पाणी प्या, गुळ खात नाहीं, पाणी पीत नाहीं. माझी कहाणी करावयाची आहे. ती तूं अगोदर ऐक, तुझी कहाणी नको ऐकूं, तर कोणाची ऐकूं? घींरांत गेली, उतरंडीचीं सहा मोतीं आणलीं, तीन आपण घेतलीं, तीन बापाच्या हातांत दिलीं,

त्यानें मनोभावें कहाणी सांगितली, लेकीनें चित्तभावें ती ऐकली. नंतर जेऊन खाऊन बाप आपल्या घरीं आला. बायकोनें विचारलें, मुलींचा समाचार कसा आहे? जिनें कहाणी ऐकली नाहीं ती दरिद्रानें पीडली, दुःखानें व्यापली, राजा मुलखावर निघून गेला. जिनें कहाणी ऐकली होती, ती भाग्यानें नांदत आहे, इकडे दरिद्री जी झाली होती तिनें आपल्या लेकाला सांगितलें, मावशी घनाघोर नांदत आहे, तिकडे जाऊन कांहीं दिलें तर घेऊन ये, पहिल्या आदितवारीं पहिला मुलगा उठला, तळ्याच्या पाळीं जाऊन उभा राहिला, अग अग दासींनो, तुह्मीं दासी कोणाच्या? आह्मी दासी प्रधानाच्या. प्रधानाच्या राणीस जाऊन सांगा कीं, तुमच्या वहिणीचा मुलगा आला आहे, कसा आला आहे? काय आला आहे? फाटकें नेसला आहे, तुटकें पांघरला आहे, तळ्याच्या पाळीला उभा राहिला आहे, परसदारानें घेऊन या. परसदारानें घेऊन आल्या, न्हाऊं माखूं घातला, पितांवर नेसावयास दिला, जेऊं खाऊं घातलं, कोहोळा पोखरला, होन मोहोरा भरल्या, बाबा ठेवूं नको, विसरूं नको, घरीं जतन करून घेऊन जा. वाटेस आपला जाऊं लागला, तों सूर्यनारायण माळ्याच्या रूपानें आला, हातचा कोहोळा काढून नेला. घरीं गेला, आईनें विचारलें, कायरे बाबा मावशीनें दिलं? देवें दिलं कर्मानें नेलं, कर्माचं फळ पुढें उभं राहिलं, मावशीनें दिलं होतं, तें पण सर्व गेलं. पुढें दुसऱ्या आदितवारीं दुसरा मुलगा गेला, तळ्याच्या पाळीं जाऊन उभा राहिला. अग अग दासींनो, तुह्मीं दासी कोणाच्या? आह्मीं दासी प्रधानाच्या. प्रधानाच्या राणीला माझा निरोप सांगा, त्यांनीं

ांगितला. मग प्रधानाच्या राणीनें त्याला घरीं नेऊन न्हाऊं माखूं घातला. पितांबर नेसावयाला दिला. जेऊं खाऊं घातला, काठी पोंखरून होनमोहरांनीं भरून दिली, बाबा ठेऊं नको, विसरूं नको, घरीं जतन करून घेऊन जा, ह्मणून सांगितलं. वाटेस सूर्यनारायण गुरंराख्याच्या रूपानें आला, हातची काठी काढून घेतली. घरीं गेला, झालेली गोष्ट राणीला सांगितली. दैवें दिलं तें सर्व कर्मानें नेलं. पुढें तिसरे आदितवारीं तिसरा मुलगा गेला, तळयाच्या पाळीं उभा राहिला. त्यालाही पहिल्यासारखा प्रधानाचे राणीनें घरीं नेऊन न्हाऊं माखूं घातला. पितांबर नेसावयाला दिला, जेऊं खाऊं घातला, नारळ पोंखरून होनमोहोरांनीं भरून दिला, ठेऊं नको, विसरूं नको, ह्मणून सांगितलें. घरीं जातांना विहिरीच्या कांठीं नारळ ठेऊन पाणी प्यावयाला विहरींत उतरला, तों नारळ गडबडून विहरींत पडला. घरीं गेला, आईनें विचारिलें कायरे बाबा मावसीनें दिलें? आईग, मावशीनं दिलं पण दैवानें तें सर्व बुडालं. चवथ्या आदितवारीं चवथा मुलगा गेला तळयाच्या पाळीं उभा राहिला, त्यालाही प्रधानाचे राणीनें घरीं नेऊन न्हाऊं माखूं खातला. पितांबर नेसावयाला दिला. जेऊं खाऊं घातलें, त्याला दह्याची शिधोरी होन मोहरा घालून बरोबर दिली. सूर्यनारायण घारीच्या रूपानें आला, हातची शिधोरी घेऊन गेला. घरीं गेला, आईनें विचारिलें कायरे बाबा मावशीनें दिलें? आईग, मावशीनं दिलं पण दैवानं तें सर्व नेलं. पांचवे आदितवारीं आपण उठली, तळयाच्या पाळीं उभी राहिली. दासींनीं तिचा निरोप तिच्या बहिणीला सांगितला. बहि-

णीनें तिलाही परसदारानें घरीं नेली. न्हाऊं घातली माखूं घातली. पाटाव नेसावयाला दिलं. प्रधानाची राणी आदितवाराची कहाणी करूं लागली, काय वसा करतेस तो मला सांग. वहीण ह्मणाली, अग अग चांडाळणी, पापिणी, बापाची कहाणी ऐकली नाहींस ह्मणून तुला दरिद्र आलं, राजाच्या राणीनें विचारलें? याला उपाय काय करूं? वरीसमासपर्यंत रहावें, वर्षांतल्या श्रावणमासीं पहिल्या आदितवारीं मोन्या उठावें, सचीळ स्नान करावें, अग्रोदक पाणी आणावें, विड्याच्या (नागवेलीच्या) पानावर रक्तचंदनाची आदित्यराणूबाई काढावी, साहा रेघांचं मंडळ करावं, सहा सुतांचा तांतू करावा, त्यास सहा गांठी द्याव्या, पानफुल वहावें, पूजा करावी, पानाचा विडा, फुलांचा झेला, दशांगाचा धूप, गुळाखोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा, सहा मास चाळावी, सहा मास पाळावी, माघी रथसप्तमी संपूर्ण करावं. संपूर्णास काय करावं? गुळाच्या पोळया, वोटव्यांची खीर, लोणकढें तूप, मेहूण जेऊं सांवं, असेल तर चिरचोळी द्यावी, नसेल तर जोडगळसरी द्यावी, नसेल तर दोन पैसे दक्षणा द्यावी, आणि आपल्या वशाचं उद्यापन करावं. असा वसा सांगितला. तेव्हां ती वहिणीच्या घरीं राहिली, श्रावणमास आला, सांगितल्याप्रमाणें सूर्यनारायणाची पूजा केली, इकडे राजाला भाग्य आलं, राजानं बोलावूं धाडलं, मावशी मावशी. तुला छत्रं आलीं, चामरं आलीं, पाइक आले परवर आले, मला रे पापिणीला छत्रं कोठलीं? चामरं कोठलीं? पाइक कोठले? परवर कोठले? बाहेर जाऊन दाराशीं बघतात, तों राजा बोलावूं आला आहे, राजा आला तशी घरीं जावयाला

निघाली आहे. एकमेकीला वहिणी वहिणींनीं अहेर केले, वाटेनें जाऊं लागलीं, तों पहिल्या मजलेस सैंपाक केला, राजाला वाढलं, मुलांना वाढलं, आपलं पान वाढून घेतलं, तेव्हां कहाणीची आठवण झाली. करारे हांकारा पिटारे दांडोरा, नगरांत कोणी उपाशीं आहे का? याचा शोध करा, उपाशीं नाहीं कांहीं नाहीं, वाटेनें एक मोळीविक्या जातो आहे; त्याला ह्मणाले, आमच्या बाईची कहाणी ऐकावयाला ये. तुझ्या बाईची कहाणी ऐकून मला काय फळ? माझं पोट भरलं पाहिजे, असें ह्मणून तो राणीकडे आला. तशीं सहा मोत्यें राणीनें घेऊन तीन त्याला दिलीं, व तीन आपल्या हातांत ठेविलीं, मनोभावें कहाणी सांगितली, चित्तभावें त्यानें ऐकली. त्याची लांकडांची मोळी होती ती सोन्याची झाली. तो ह्मणाला, बाई बाई! कहाणी ऐकल्याचें एवढें फळ, वसा घेतल्याचें काय फळ? काय वसा आहे तो मला सांगा? तुला रे वसा कशाला व्हावा, उतशील मातशील, घेतला वसा टाकून देशील, उतत नाहीं, मातत नाहीं, घेतला वसा टाकीत नाहीं. तेव्हां ती ह्मणाली, श्रावण मास येईल. पहिल्या आदितवारीं मुकाट्यानें (मौन्या) उठावें, सचौळ स्नान करावें, इत्यादि उद्यापनापर्यंत सगळा वसा राणीनें त्याला सांगितला. पुढें दुसऱ्या मजलेस गेलीं. सैंपाक केला, राजाला वाढलं, मुलांना वाढलं आपलं पान वाढून घेतलं, तेव्हां कहाणीची आठवण झाली. करारे हांकारा पिटारे दांडोरा, नगरांत कोणी उपाशीं आहे का? याचा शोध करा, उपाशीं नाहीं कांहीं नाहीं, माळ्याचा मळा पिकत नाहीं, विहीरीला पाणी लागत नाहीं. असा एक माळी चिंतेनें

बसला आहे, त्याला हांक मारली, आमच्या बाईची कहाणी ऐक. तो आला, राणीनें सहा मोत्यें घेऊन तीन त्याला दिलीं तीन आपण घेतलीं राणीनें कहाणी मनोभावें सांगितली, ती चित्तभावें माळ्यानें ऐकली, माळ्याचा मळा पिकूं लागला, विहिरीला पाणी आलें, तो ह्मणाला बाई बाई! काहणी ऐकिल्याचें एवढं फळ, वसा घेतल्याचें काय फळ? काय वसा असेल तो मला सांगा मग राणीनें त्याला वसा सांगितला. पुढें तिसऱ्या मजलेस गेलीं, सैंपाक केला राजाला वाढलं, मुलांना वाढलं आपलं पान वाढून घेतलं तेव्हां कहाणीची आठवण झाली. करारे हांकारा पिटारे दाडोरा, नगरांत कोणी उपाशीं आहे का? याचा शोध करा, उपाशीं नाहीं कांहीं नाहीं, एक म्हातारी तिचा मुलगा वनांत गेला होता, एक डोहांत बुडाला होता, एक सर्पानें खाल्ला होता, यामुळें चिंताक्रांत बसली होती, तिला ह्मणाले, आमच्या बाईची कहाणी ऐक. ती ह्मणाली कहाणी ऐकून मी काय करूं, मी मुलांसाठीं रडतें आहें, बरें येतें. मग ती राणीकडे आली. राणीनें पहिल्याप्रमाणें तिला कहाणी सांगितली. तिनें चित्तभावें ऐकली. तिचा मुलगा वनांत गेला होता तो आला, डोहांत बुडाला होता तो आला, सर्पानें खाल्ला होता तो आला, ती ह्मणाली, बाई बाई! कहाणी ऐकल्याचें हें फळ. मग वसा घेतल्याचें काय फळ? काय वसा तो मला सांगा. मग राणीनें तिलाही वसा सांगितला. पुढें चौथे मजलेस गेलीं, सैंपाक केला, राजाला वाढलं, मुलांना वाढल आपलं पान वाढून घेतलं, तेव्हां कहाणीची आठवण झाली. करारे हांकारा पिटारे दांडोरा, नगरांत कोणी उपाशीं आहे का? याचा

शोध करा; उपाशीं नाहीं कांहीं नाहीं, काणा डोळा मांसाचा गोळा, हात नाहीं, पाय नाहीं, असा एक मनुष्य रस्त्यामध्यें पडला होता, त्याच्या अंगावर तांब्याभर पाणी ओतलं, पालथा होता तो उताणा केला, सहा मोतें होतीं, त्यांतलीं तीन मोतीं त्याच्या वेंबीवर ठेविलीं, तीन मोत्यें आपण घेतलीं. राणीनें मनोभावें कहाणी सांगितली, ती त्यानें चित्तभावें ऐकली. त्याला हात पाय आले, देह दिव्य झाला, तो ह्मणाला, कहाणी ऐकल्याचें एवढें फळ. मग वसा घेतल्याचें काय फळ? काय वसा तो मला सांगा. मग राणीनें त्यालाही वसा सांगितला. पांचव्या मुक्कामास घरीं आले, सैंपाक केला, सूर्यनारायण जेवावयास आले, साती दरवाजे उघडले, लोहघंगाळें पाणी तापवलें, षड्रस पक्वान्नें जेवावयास केलीं, सूर्यनारायण भोजनास बसले, त्यांना पहिल्या घांसास केंस लागला, ते ह्मणाले, अग अग, कोणा पापीणीचा केंस आहे? राजाच्या राणीला बारा वर्षे दरिद्र आलं होतं, तिनं आदितवारीं वळचणीखालीं बसून केंस विंचरले होते, काळंचवाळं, डोईचा केंस, वळचणीची काडी, डाव्या खांद्यावरून वेशीबाहेर टाकून दे, राजाच्या राणीला सूर्यनारायणाचा कोप झाला तसा कोणाला होऊं नये. ब्राह्मणाला, मोळीविक्याला, राजाच्या राणीला, माळ्याला, म्हातारीला, काणाडोळा मांसाचा गोळा, इतक्यांनां जसा सूर्यनारायण प्रसन्न झाला तसा तुह्मां आह्मांला होवो, कळली वळली, गाईच्या गोठीं पिंपळाच्या पारीं, भल्या ब्राह्मणाच्या द्वारीं, साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

---

टीप- या कथेंत वडिलांचा उपमर्द व ईश्वरभक्तीची अवहेलना

केल्यानें काय दशा होते, व हेच गुणानुवाद भक्तीनें ऐकल्यानें कशी स्थिति प्राप्त होते, हें दाखविलें आहे. दुसरें, ईश्वरी कोप झाला ह्मणजे आपण कितीही संपत्ति राखून ठेविली तरी ती रहात नाहीं; व तोच प्रसन्न होऊन देऊं लागला ह्मणजे मनुष्याच्यानें घेववतही नाहीं; इतकी मिळते. ह्याचें स्पष्टीकरण दाखविलें आहे.

---

## सोमवाराची कहाणी.

### ( साधी )

आट पाट नगर होतं, तिथं एक ब्राह्मण होता. त्याचा एक शिष्य होता, तो रोज तळयावर जाई, स्नान करी, शंकराची पूजा करी, वाटेंत वेळूचं बेट होतं, परत येऊं लागला ह्मणजे "मी येऊं" "मी येऊं" असा ध्वनि उठे, हा मागे पाही, तों तेथें कोणी नाहीं, त्या भीतीनें वाळूं लागला, तेव्हां गुरूनें विचारलें, खायला प्यायला वाण नाहीं, बाबा असा रोड कां? खायला प्यायला वाण नाहीं. हाल नाहीं, अपेष्टा नाहीं, स्नान करून येतेवेळेस मला कोणी "मी येऊं" "मी येऊं" असें ह्मणतें, मागें पाहतों तों कोणी नाहीं, ह्याची मला भीति वाटते. गुरूजी ह्मणाले, भिऊं नको, मागं कांहीं पाहूं नको, खुशाल त्याला ये ह्मण. तुझ्या मागून येऊं दे, मग शिष्यानें काय केलें? रोजच्या प्रमाणें स्नानास गेला, पूजा करून येऊं लागला, "मी येऊं" असा ध्वनि झाला, ये ये असा जबाब दिला, मागं कांहीं पाहिलं नाहीं, चालत्या पावलीं घरीं आला. गुरूजीनें पाहिलें, बरोबर एक मुलगी आहे. त्या दोघांचं लगीन लावलं. त्यांना एक घर दिलं, त्या नंतर काय झालं? श्रावणीं सोमवार आला, बायकोल ह्मणूं लागला, माझी वाट पाहूं नको, उपाशीं राहूं नको

आपण उठला. शंकराचे पूजेला गेला, हिनें थोडी वाट पाहिली. सैंपाक करून जेवाला बसली, एक घास तोंडांत घातला, इतक्यामध्यें पति आला, अग अग दार उघड, पुढचं ताट पलंगाखालीं ढकलून दिलं, हात धुतला, दार उघडलं, पति घरांत आले, नित्य नेम करूं लागले, पुढें दुसरा सोमवार आला, त्या दिवशींही असंच झालं, असं चारी सोमवार झालं, सरता सोमवार आला, रात्रीं नवल झालं, तें नवल काय झालं? दोघंजणं पलंगावर गेलीं, पलंगाखालीं उजेड दिसला, हा उजेड कशाचा? ताटीं भरल्या रत्नांचा, हीं रत्नं कुठून आणलीं? मनांत भिऊन गेली, माझ्या माहेरच्यांनीं दिलीं, तुझं माहेर कोठं आहे? वेळूच्या बेटीं आहे. मला तिथं घेऊन चल, पतीसह चालली, मनीं शंकराची प्रार्थना केली, मला अर्धघटकेचें माहेर दे. तों वेळूचं बेट आलं, मोठा एक वाडा आला, कोणी ह्मणे माझा मेहुणा आला, कोणी ह्मणे माझा जांवई आला, कोणी ह्मणे माझी नणंद आली, कोणी ह्मणे माझी बहीण आली, दासी बटकी राबताहेत, शिपाई पहारा करताहेत, बसायाला पाट दिला, भोजनाचा थाट केला, जेवणं झालीं, सासूसासऱ्यांची आज्ञा घेतली, घरीं परतले, अर्ध्या वाटेंत आठवण झाली, खुंटीवर हार राहिला, तेव्हां उभयतां परत गेलीं, घर नाहीं. दार नाहीं, शिपाई नाहीं, प्यादे नाहींत, दासी नाहींत बटकी नाहींत, एक वेळूचं बेट आहे, तिथें आपला हार पडला आहे, हार उचलून गळ्यांत घातला, नवऱ्यानें विचारलं, इथलं घर काय झालं? जसं आलं तसं गेलं, अभय असेल तर सांगतें. चार सोमवारीं आपली हाक ऐकली, जेवतीं ताटं ढकलून

दिलीं, रत्नांनीं भरलीं, सोन्याचीं झालीं, ती मला देवांनीं दिलीं. आपण विचारूं लागलां तेव्हां भिऊन गेलें, माहेरचीं ह्मणून सांगितलें, शंकराची प्रार्थना केली, अर्धघटकेचें माहेर मागितलें, त्यांनीं तुमची खात्री केली, माझी इच्छा परिपूर्ण झाली. जसा त्यांना शंकर पावला, तसा तुह्मां आह्मां पावो, ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

---

टीप.– भक्ताचें संकट परमेश्वर हरतऱ्हेनें चमत्कार करून निवारण करतो, हें ह्या कथेंत दर्शविलें आहे.

---

## सोमवाराची कहाणी.

( खुलभर दुधाची )

ऐका परमेश्वरा सोमवारा तुझी कहाणी, आटपाट नगर होतं, तिथं एक राजा होता, तो मोठा शिवभक्त असे. त्याच्या मनांत आपल्या महादेवाचा गर्भारा दुधानें भरावा, परंतु हें घडतें कसें? अशी त्यास चिंता पडली. पुढें काय झालं? प्रधानानें त्यास युक्ति सांगितली, राजानं दंवडी पिटली, सर्व गावांतल्या माणसांनीं आपल्या घरचें सगळं दूध घेउन दर सोमवारीं महादेवाच्या देवळीं पुजेला यावं, अशी दंवडी पिटल्यावर सर्वांना बाई धाक पडला, घरोघरचीं माणसं घाबरून गेलीं, काय करावं हें कोणाला कांहीं सुचेनासं झालं, त्याप्रमाणें घरांत कोणी दूध ठेवलं नाहीं, वासरानां पाजलं नाहीं, मुलानां दिलं नाहीं, सगळं दूध देवळांत नेलं, गांवचं दूध सगळं जरी गर्भाऱ्यांत पडलं, तरी देवाच्या गर्भारा भरला नाहीं, त्या दिवशीं दुपारीं एक

चमत्कार झाला, तो काय झाला? त्याच नगरांत एक म्हातारी बाई होती; तिनं आपल्या घरचं कामकाज आटपलं, मुलाबाळांना खाऊं घातलं, लेकीसुनांना न्हाऊं घातलं, गाईवासरांना चारा घातला, त्यांचा आत्मा थंड केला, पुढें तिनं काय केलं? आपल्या जिवाचं सार्थक व्हावं म्हणून थोडं गंध फूल घेतलं, चार तांदुळांचे दाणे घेतले, दोन बेलाचीं पानं घेतलीं, आणि खुलभर दूध घेतलं, ती बाई देवळांत आली, मनोभावें पूजा केली, थोडं दूध नैवेद्याला ठेवलं, देवाची प्रार्थना केली, जय महादेवा, नंदिकेश्वरा, राजानं पुष्कळ दूध तुझ्या गर्भाऱ्यांत घातलंन, तरी तुझा गर्भारा भरला नाहीं, माझ्या खुलभर दुधानें भरणार नाहीं, पण मी आपली भावें भक्तीनें अर्पण करतें. असें ह्मणून राहिलेलें दूध गर्भारीं अर्पण केलें, पूजा घेऊन मागें परतली, इकडे चमत्कार काय झाला? म्हातारी परतल्यावर गर्भारा भरून गेला, हें गुरवानं पाहिलं, राजाला कळवलं, परंतु त्याचा कांहीं केल्या पत्ता लागेना, दुसऱ्या सोमवारीं राजानें शिपाई देवळीं बसवले, तरीही शोध लागला नाहीं, चमत्कारही असाच झाला, पुढें तिसऱ्या सोमवारीं राजा बसला, म्हातारीचे वेळेस गर्भारा भरला. राजानें तिचा हात धरला, म्हातारी घाबरून गेली; तिला राजानें धीर दिला, अभयवचन दिलं, आह्मी येवढं दूध घातलं तरी गर्भारा भरला नाहीं; खुलभर दुधानं गर्भारा कसा भरला? ह्याचं मला कारण सांग. तिनं सांगितलं, तुझ्या आज्ञेनं काय झालं? वासरांचे, मुलांचे आत्मे तळतळले, मोठ्या माणसांचे हाय हाय माथीं आले, हें देवाला आवडत नाहीं. ह्मणून गर्भारा भरत नाहीं, या‌ला युक्ति

काय करावी ? मुलावासरांना दूध पाजावं, घरोघर सगळ्यांनीं आनंद करावा, देवाला भक्तीनें पंचामृती स्नान घालावं, दुधाचा नैवेद्य दाखवावा, म्हणजे देवाचा गभारा भरेल, देव संतुष्ट होईल. नंतर म्हातारीला सोडून दिलं, गांवांत दंवडी पिटवली, चवथ्या सोमवारीं राजानें पूजा केली, मुलाबाळांना गाईवासरांना दूध ठेवून उरलेलें दूध देवाला वाहिलें, हात जोडून प्रार्थना केली, डोळे उघडून पाहतात तों देवाचा गभारा भरून आला, राजाला आनंद झाला, म्हातारीला इनाम दिलं, ती घरीं आली, लेंकी सुना घेऊन सुखानें नांदूं लागली. तसें तुम्ही आम्ही नांदूं. ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

---

**टीप**–ही कहाणी मोठी बोध घेण्यासारखी आहे. मुलें भुकेनें तळतळत असतात आणि आई तुळशीला लाखोली (प्रदक्षिणेची) घालीत असते. हें ईश्वराला कितपत आवडत असेल ह्याचा विचार मनांत वागवावा. आपल्या आश्रयानें असणाऱ्यास सुख देण्यांतच ईश्वराला आनंद आहे. हें ह्या कहाणीवरून स्पष्ट दिसतें.

---

## सोमवाराची.

### ( शिवामुठीची कहाणी. )

आट पाट नगर होतं, तेथें एक राजा होता, त्या राजाला चार सुना होत्या. तीन आवडत्या होत्या, एक नावडती होती, आवडत्या सुनांचा तो चांगला प्रतिपाळ करी, नावडतीस जेवावयाला उष्टें, नेसायास जाडें भरडें, रहावयास गुरांचें वेडें दिलें, काम गुराख्याचें सांगितलें, पुढें श्रावणमास आला, पहिला सोमवार आला, ही रानीं गेली, नागकन्या देवकन्यांची गांठ झाली, त्यांना विचारलं बाई

बाई कोठें जातां? महादेवाच्या देवळीं जातों, शिवामूठ वाहतों, यानं काय होतं? भ्रताराची भक्ति होते इच्छित कार्य सिद्धीस जातं, मुलंबाळं होतात, नावडतीं माणसं आवडतीं होतात, वडील मनुष्यांपासून सुखप्राप्ति होते, मग त्यांनीं हिला विचारलं तूं कुणाची कोण? मी राजाची सून, तुमचे बरोबर येतें. त्यांचे बरोबर देवळांत गेली, नागकन्या, देवकन्या वसा वसूं लागल्या, नावडी ह्मणाली, कायग बायांनों वसा वसतां? आह्मी शिवामुठीचा वसा वसतों, त्या वशाला काय करावं? मूठचिमूठ तांदूळ घ्यावे, शिवराई सुपारी घ्यावी. गंध फूल घ्यावं, दोन बेलाचीं पानं घ्यावीत, मनोभावें देवाची पूजा करावी. नंतर हातीं तांदूळ घ्यावे. आणि तोंडानें "शिवा शिवा महादेवा, माझी शिवामूठ ईश्वरा देवा, सासूसासऱ्या, दिराभावा, नणंदाजावा, भ्रतारा, नावडती आहे ती आवडती कर रे देवा." असें ह्मणून तांदूळ वहावेत. संध्याकाळपर्यंत उपास करावा, उष्टंमाष्टं खाऊं नको, दिवसा निजूं नको, उपास नाहीं निभावला तर दूध प्यावं, संध्याकाळीं अंघोळ करावी, देवाला बेल वहावा, आणि मुकाट्यानें जेवण करावं, हा वसा पांच वर्षें करावा. पहिल्या सोमवारीं तांदूळ, दुसऱ्यास तीळ, तिसऱ्यास मूग, चवथ्यास जव, आणि पांचवा आला तर सातु शिवामुठीकरितां घेत जावेत. पहिल्या सोमवारीं सगळं साहित्य नागकन्या देवकन्यांनीं दिलं, आणि दुसऱ्या सोमवारीं हिला घरून आणावयास सांगितलं. त्या दिवशीं हिनं मनोभावें पूजा केली, सारा दिवस उपास केला, जावा नणंदांनीं उष्टंमाष्टं पीन दिलं, तें तिनं गाईला घातलं, शंकराची आराधना केली, आणि दूध पिऊन निजून रा-

हिली. पुढें दुसरा सोमवार आला, नावडीनं घरांतून सर्व सामान मागून घेतलं, पुढें रानांत जाऊन नागकन्यैबरोबर मनोभावें पूजा केली, आणि "शिवा शिवा महादेवा, माझी शिवामूठ ईश्वरादेवा, सासुसासऱ्या, दिराभावा, नणंदाजावा, भ्रतारा, नावडती आहे ती आवडती कर रे देवा" असें ह्मणून तीळ वाहिले. सारादिवस उपास केला, घरांतून उष्टं मिळालं होतं तें गाईला खाऊं घातलं, शंकराला बेल वाहिला, आणि दूध पिऊन निजून राहिली. संध्याकाळीं सासऱ्यानें विचारलं, तुझा देव कुठं आहे? नावडीनं जाब दिला. माझा देव फार लांब आहे, वाटा कठीण आहेत, कांटेकुटे आहेत, साप वाघ आहेत, तेथें माझा देव आहे. पुढें तिसरा सोमवार आला, पूजेचं सामान घेतलं, देवाला जाऊं लागली, घरचीं माणसं मागें चाललीं, नावडे तुझा देव दाखव, ह्मणून ह्मणूं लागलीं. नावडीला रोजचा सराव होता, तिला कांहीं वाटलं नाहीं, ह्यांना कांटेकुटे पुष्कळ लागले. नावडीची दया आली, आजपर्यंत रानांत कशी येत असेल कोण जाणे. नावडीला चिंता पडली, देवाची प्रार्थना केली, देवाला तिची करुणा आली, नागकन्या देवकन्या ह्या सहवर्तमान देऊळ सुवर्णाचं झालं, रत्नजडिताचे खांब झाले, हांड्यागलासं लागलीं, स्वयंभू महादेवाची पिंडी झाली, सगळ्यांनीं देवाचं दर्शन घेतलं. नावडी पूजा करूं लागली, गंध फूल वाहूं लागली, नंतर मूग घेऊन "शिवा शिवा महादेवा, माझी शिवामूठ ईश्वरा देवा, सासुसासऱ्या, दिराभावा, नणंदाजावा, भ्रतारा, नावडती आहे ती आवडती कर रे देवा" असें ह्मणून शिवाला वाहिले. राजाला मोठा आनंद झाला, नावडीवर प्रेम वाढलं, डागीने ल्यायला दिले. खुंटीवर पागोटें ठेवून तळें पहावयाला गेला.

नावडीची पूजा झाली, पूजा झाल्यावर सगळीं माणसं बाहेर आलीं, इकडे देऊळ अदृश्य झालं, राजा परत आला, माझं काय पागोट देवळीं राहिलं. देवळाकडे आणायला गेले. तों तेथें एक लहान देऊळ आहे, तिथं एक पिंडी आहे, वर आपण केलेली पूजा आहे, जवळ खुंटीवर पागोटें आहे, तेव्हां त्यांनीं सुनेला विचारलं, हें असं कसं झालं? माझा गरीबाचा हाच देव. मी देवाची प्रार्थना केली त्यांनीं तुह्मांला दर्शन दिलं. सुनेमुळें देव भेटला ह्मणून तिला पालखींत घालून घरीं आणली. नावडती होती ती आवडती झाली. जसा तिला शंकर प्रसन्न झाला तसा तुह्मा आह्माला होवो. ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं पिंपळाच्या पारीं, देवा ब्राह्मणाच्या द्वारीं, सुफळ संपूर्ण.

---

टीप–ही कथा फार चमत्कारीक आहे, राग घालविण्याचा उपाय या मांत्राची एक गोष्ट प्रसिद्ध आहे तींत म्हातारीनें नवरा रागावल्याबरोबर मिठाच्या पाण्याचा गुळणा तोंडांत धरण्याचा उपाय सांगितला तसाच हा नावडती आहे ती आवडती होण्याचा उत्तम उपाय आहे. आपल्या प्रेमाकरितां कोणी मनुष्य नित्य ईश्वराची प्रार्थना मनोभावें करीत आहे असें कळल्यावर त्याजवर कोण मनुष्य प्रेम करणार नाहीं? हें व्रत भविष्योत्तरपुराणांत आहे.

---

## सोमवाराची.

### ( फसकीची कहाणी. )

ऐका महादेवा तुझी कहाणी, आटपाट नगर होतं, त्यांत एक गरीब सवाशीण बाई रहात असे, तिनं आपलं श्रावणमास आला," ह्मणजे काय करावं कीं, आपलं दर सोमवारीं पहाटेस उठावं, स्नान करावं, पूजा घ्यावी, एक

उपडा दुसरा उताणा, पसाभर तांदूळ घ्यावेत, व महादेवाच्या देवळीं जाऊन मनोभावें पूजा करावी, नंतर प्रार्थनेच्या-वेळीं जय महादेवा घे फसकी, व दे लक्ष्मी, असें ह्मणून महादेवाच्या मस्तकीं तांदूळ अर्पण करावे, उरले तांदूळ नंदीच्या पाठीवर वाहून आपण घरीं यावं, असं बरेच दिवस तिनं केलं, शंकर तिला प्रसन्न झाला, दिवसेंदिवस ती श्रीमंत झाली, मनामध्यें समाधान पावली, पुढें उद्यापनाचे-वेळीं तिनं देवी अन्नपूर्णेला गजनीची चोळी पाठविली, काशीविश्वेश्वराला रुपया पाठविला, आणि आपल्या व्रताची समाप्ति केली, शंकरांनीं तिला निरोप पाठविला, अजून तुला नंदीच्या सेवेचं फळ मिळालं नाहीं, माझ्या सेवेचं तर अद्याप देणेंच आहे. पुढें शंकरांनीं तिला अपार देणं दिलं, तर जसा तिला विश्वेश्वर प्रसन्न झाला तसा तुह्मां आह्मां होवो. ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं पिंपळाच्या पारीं, देवा ब्राह्मणाच्या द्वारीं सुफळ संपूर्ण.

---

**टीप**–परमेश्वराचें देणें किती विचित्र आहे हें ह्यांत दाखविलें आहे.

---

## कहाणी मंगळागौरीची.

आट पाट नगर होतं, तिथं एक वाणी होता, त्याला कांहीं मुलगा नव्हता, त्याच्या घरीं एक गोसावी येई, अलक ह्मणून पुकारा करी, वाण्याची बायको भिक्षा आणी, निपुत्रिकाच्या हातची भिक्षा घेत नाहीं. ह्मणून हा चालता होई. ही गोष्ट तिनें नवऱ्याला सांगितली, त्यानें तिला युक्ति सांगितली. दाराच्या आड लपून बस, अलक ह्मणतांच सुवर्णाची भिक्षा घाल, अशी भिक्षा झोळींत घातली. बोवाचा नेम मोडला, बाईवर फार रागावला, मूल-

नाळ होणार नाहीं असा शाप दिला, तिनें त्याचे पाय धरले, बोवांनीं उःशाप दिला, बोवा ह्मणाले, आपल्या नवऱ्याला सांग, निळ्या घोड्यावर बस, निळीं वस्त्रें परिधान कर, रानांत जा, जेथें घोडा अडेल तेथें खण, देवीचं देऊळ लागेल, तिथं तिची प्रार्थना कर, ती तुला पुत्र देईल. असं बोलून बोवा चालता झाला, तीनें आपल्या पतीला सांगितलं, वाणी रानांत गेला, घोडा अडला तिथं खणलं, देवीचं देउळ लागलं, सुवर्णाचं देऊळ आहे, हिरेजडिताचे खांब आहेत, माणकांचे कळस आहेत, आंत देवीची मूर्त आहे, मनोभावें पूजा केली, त्याला देवी प्रसन्न झाली, वर माग ह्मणाली, घरं आहेत, दारं आहेत, गुरं आहेत, ढोरं आहेत, धन आहे, द्रव्य आहे, पोटीं पुत्र नाहीं ह्मणून मी दुःखी आहें. देवी ह्मणाली, तुला संततीचं सुख नाहीं, मी प्रसन्न झालें आहें, तर तुला देतें, अल्पायुषी पुत्र घेतलास तर गुणी मिळेल, दीर्घायुषी घेतलास तर जन्मांध होईल, कन्या घेतलीस तर बालविधवा होईल, इच्छा असेल तें मागून घे, ह्यांनीं अल्पायुषि पुत्र मागितला, देवीनं माझ्या मागल्या बाजूस जा, तेथें एक गणपती आहे, त्याच्या मागें आंब्याचें झाड आहे, गणपतीच्या दोंदावर पाय दे, एक फळ घे, घरीं जाऊन बायकोस खाऊं घाल, ह्मणजे तुझा कार्यभाग होईल, नंतर देवी अदृश्य झाली, पुढें हा देवळामागें गेला, गणपतीच्या दोंदावर पाय दिला, झाडावर चढला, पोटभर आंबे खाल्ले, मोटभर घरीं नेण्याकरितां घेतले, खालीं उतरून पाहूं लागला, तों आपला मोटेंत आंबा एकच आहे, असें चार पांच वेळां झालं, गणपतीला त्रास झाला, त्यांणें सांगितलं, तुझ्या

नशीबीं एकच फळ आहे, मग फळ घेऊन घरीं आला, बायकोला खाऊ घातलं, ती गरोदर राहिली, दिवसामासा गर्भ वाढू लागला, नवमास पूर्ण झाले, वाण्याची बायको बाळंतीण झाली, मुलगा झाला, उभयतांस मोठा आनंद झाला, दिवसामासीं वाढूं लागला, आठव्या वर्षीं मुंज केली, दहाव्या वर्षीं लग्न करा ह्मणाली, काशीयात्रेशिवाय लग्न करणें नाहीं असा माझा नवस आहे, असा जबाब दिला, कांहीं दिवसांनीं मामाबरोबर यात्रेस पाठविलें, मामाभाचे काशीस जाऊं लागले, जातां जातां काय झालं? वाटेनं एक नगर लागलं, तेथें कांहीं मुली खेळत होत्या, त्यांत एकमेकींचं भांडण लागलं, एक गोरी भुरकी मुलगी होती, तिला दुसरी मुलगी ह्मणूं लागली "काय रांड द्वाड आहे" "काय रांड द्वाड आहे" तेव्हां ती मुलगी ह्मणाली, माझी आई मंगळागौरीचं व्रत करिते, आमच्या कुळामध्यें आमच्या वंशामध्यें कोणी रांड होणार नाहीं, मग मी तर तिची मुलगी आहें, हें भाषण मामानीं ऐकलं, त्याच्या मनांत आलं, हिशीं आपल्या भाच्याचं लगीन करावं, ह्मणजे हा दीर्घायुषी होईल, परंतु हें घडतें कसें? त्या दिवशीं तेथें त्यांनीं मुक्काम केला इकडे काय झालं? त्याच दिवशीं त्या मुलीचं लग्न होतं, लग्नाचे वेळेस नवरा मुलगा मांदा झाला, मुलाचे आईबापास पंचाईत पडली, पुढें कोणी तरी प्रवासी मिळेल तर बरें होईल त्याला पुढें करून वेळ साजरी करूं; ह्मणून धर्मशाळा पाहूं लागले, मामाभाचे दृष्टीस पडले, मामापासून भाच्यास नेलें, गोरज लग्न लाविलें, उभयतांस गौरीहरापाशीं निजविलें, दोघें झोपीं गेलीं, मुलीस देवीनं दृष्टांत दिला, अग अग मुली, तुझ्या नवऱ्याला दंश

करण्याला, सर्प येईल, त्याला पिण्याकरितां दूध ठेव, व एक कोरा करा जवळ ठेव, दूध पिऊन सर्प कऱ्यांत शिरेल, तूं आंगच्या चोळीनं तोंड बांधून टाक, सकाळीं उठून आ-ईस तें वाण दे. याप्रमाणें झाल्यावर तिनं सर्व तयारी के-ली, दृष्टांताप्रमाणें सर्व घडून आलं, कांहीं वेळानं तिचा नवरा उठला, भूक लागली ह्मणून सांगूं लागला, त्यास लाडू खायला दिले, फराळ झाल्यावर तिला आपली आं-गठी दिली, पहांटेस उठून ताट घेउन आपले बिऱ्हाडीं गेला, मामाभाचे रोजच्या प्रमाणें मार्गस्थ झाले, दुसरे दि-वशीं काय झालं? हिनं सकाळीं उठून स्नान केलं, आप-ल्या आईला वाण दिलं, आई उघडून पाहूं लागती तों आंत हार निघाला, आईनें तो हार कन्येच्या गळयांत घा-तला, पुढें पहिला वर मांडवांत आला, खेळाला मुलीला आणली, ती ह्मणाली हा माझा नवरा नाहीं, मी याज-बरोबर खेळत नाहीं, रात्रीची लाडवाची व आंगठीची खूण कांहीं पटेना, आईबापांना पंचाइत पडली, हिचा नवरा कसा सांपडतो, नंतर त्यांनीं अन्नछत्र चालूं केलं, जो ब्राह्मण येईल त्याचे पाय अंगठी घालून मुलीनीं धुवावे, आईनें पाणी घालावें, भावांनीं गंध लावावें, आणि बा-पानें विडा द्यावा, असा क्रम चालू केला, शेंकडो लोक येऊन जेऊं लागले, इकडे मामाभाचे काशीस गेले, पु-ष्कळ दानधर्म केले, तीर्थयात्रा केल्या, ब्राह्मणांचे अशीर्वाद घेतले, एके दिवशीं भाच्यास मूर्छा आली, यमदूत प्राण न्यावयाला आले, मंगळागौर आडवी झाली, त्या दोघांचें युद्ध झालें, यमदूत पळून गेले, गौर तेथें अदृश्य झाली, भाचा जसा जागा झाला, तसा आपल्या मामास सांगूं लागला, मला

असं स्वप्न पडलं, मामा ह्मलाला, ठीक झालं, तुझ्यावरचं विघ्नच टळलं, उद्यां आपण घरीं जाऊं, परत येऊं लागले. लग्नाच्या गावीं आले, तळ्यावर स्वयंपाक करूं लागले, दासींनीं येऊन सांगितलं येथें अन्नछत्र आहे, तेथें जेवायला जा, हे ह्मणाले आह्मी परान्न घेत नाहीं, दासींनीं यजमाननीस सांगितलं, ह्यांनीं पालखी पाठविली, आदरातिथ्यानं घरीं नेलं, पाय धुतांना मुलीनें नवऱ्याला ओळखलं, नवऱ्यानें आंगठी ओळखली, आईबापांनीं विचारलं तुजजवळ खूण काय आहे? त्यानें लाडवांचं ताट दाखवलं, सर्वांना आनंद झाला, भोजनसमारंभ झाला, मामाभाचे सून घेऊन घरीं आले, सासूनें सुनेचे पाय धरले, तुझ्यामुळें माझा मुलगा वांचला असें ह्मणाली, तिनें सांगितलं मला मंगळागौरीचं व्रत असतं, ही सगळी तिची कृपा, सासरमाहेरचीं, घरचीं दारचीं, माणसं सर्व एकत्र झालीं, आणि त्या व्रताचं उद्यापन केलं, जशी तिला मंगळागौर प्रसन्न झाली तशी तुह्मां आह्मां होवो, आणि आपलं सौभाग्य अखंड राहो, इतकीच देवीची प्रार्थना करा. ही धर्मराजाला कृष्णानें सांगितलेली साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

---

**टीप**– ही कथा मोठी रसाळ आहे. ह्यांत लबाडी करून त्या बिचाऱ्या मुलीस फसविण्याचा हेतु होता तो परमेश्वरानें सिद्धीस जाऊं दिला नाहीं. व कन्येच्या एकनिष्ठेचें फल तीस देऊन संतोषी केलें. ईश्वरभक्तीच्या योगानें वराचा अपमृत्युही टळला, आणि उभयतां मातापितरांस आनंद झाला. ही कथा व्रतराजांत आहे. श्रावणमहात्म्यांतही अशीच कथा आहे पण त्यांत राजाच्या नांवाची कथा असून थोडा थोडा हेरफेर आहे.

## बुध बृहस्पतीची कहाणी.

ऐका बुधबृहस्पतीनों तुमची कहाणी, आटपाट नगर होतं, तिथं एक राजा होता, त्याला सात मुलगे होते, सात सुना होत्या, त्यांच्या घरीं रोज एक मामाभाचे भिक्षेस जात असत, राजाच्या सुना, आमचे हात रिकामे नाहींत ह्मणून सांगत असत, असे पुष्कळ दिवस गेल्यावर कालें-करून त्यांस दरिद्र आलं, सर्वांचे हात रिकामे झाले, मा-माभाचे पूर्वीप्रमाणें भिक्षेला आले, सर्व सुनांनीं सांगितलें कांहीं असतं तर दिलं असतं, आमचे सर्वांचे हात रिकामे झाले, सर्वांत धाकटी सून होती ती फार शहाणी होती, तिनें विचार केला, होतं तेव्हां दिलं नाहीं, आतां नाहीं ह्मणून नाहीं, ब्राह्मण विन्मुख जातात, ती त्यांच्या पाया पडली, त्यांस सांगूं लागली, आह्मी संपन्न असतां धर्म केला नाहीं ही आमची चुकी आहे, आतां आह्मी पूर्वी-सारखे होऊं, असा कांहीं उपाय सांगा, ते ह्मणाले श्राव-णमासीं दर बुधवारीं आणि बृहस्पतवारीं जेवावयास ब्राह्मण सांगावा, आपला पति प्रवासीं जाऊन घरीं येत नसल्यास दाराच्या पाठीमागें दोन बाहुलीं काढावीं, संपत्ति पाहिजे असल्यास पेटीवर, धान्य पाहिजे असल्यास कोठीवर का-ढावीं, त्यांची मनोभावें पूजा करावी, अतिथी यांचा सत्कार करावा, ह्मणजे इच्छित हेतु पूर्ण होतात. त्याप्रमाणें ती करूं लागली, एके दिवशीं तिला स्वप्न पडलं, ब्राह्मण जे-वीत आहेत, मी चांदीच्या भांड्यांत तूप वाढतें आहे, ही गोष्ट तिनें दुसरे दिवशीं आपले जावांना सांगितली, त्यांनीं तिची थट्टा केली, इकडे काय चमत्कार झाला? तिचा न-वरा प्रवासास गेला होता, त्या नगरचा राजा मेला, गा-

दीवर दुसरा राजा बसविल्याशिवाय प्रेत दहन करावयाचें नाहीं. ह्मणून तेथील लोकांनीं काय केलं? हत्तीणीच्या तोंडांत माळ दिली, तिला नगरांत फिरविली, "ज्याच्या गळ्यांत माळ घालील, त्याला राज्याभिषेक होईल." अशी दौंडी पिटविली, हत्तीणीनें ह्या बाईच्या नवऱ्याच्या गळ्यांत माळ घातली, मंडळींनीं त्याला हाकलून दिलं, पुन्हां हत्तीण माळेसह मंडळींनीं फिरवली, पुन्हां तिनें ह्याच्याच गळ्यांत माळ घातली, याप्रमाणें तिनदां झालं, पुढें त्यांनीं त्याला राज्याभिषेक केला, नंतर त्यानें आपल्या माणसांची चौकशी केली, तेव्हां तीं अन्न अन्न करून देशोधडीस लागल्याची खबर समजली, मग राजानें काय केलें? मोठ्या तलावाचें काम सुरू केलें, हजारो मजूर खपूं लागले, तेथें ह्याचीं माणसं आलीं, राजानें आपली बायको ओळखली, तिला ह्यानें ओळख दिली, मनामध्यें संतोष झाला, तिनें बुधबृहस्पतीच्या व्रताची व स्वप्नाची हकीकत कळवली, देवानें देणगी दिली, पण जावांनीं थट्टा केली, राजानें तें गोष्ट मनांत ठेविली, ब्राह्मणभोजनाचा थाट केला, हिच्या हातांत चांदीचं भांडं दिलं, तूप वाढूं सांगितलं, ब्राह्मण जेवून संतुष्ट झाले, जावांनीं तें पाहिलें, त्यांचा सन्मान केला, मुलं बाळं झालीं दुःखाचे दिवस गेले, सुखाचे दिवस आले, जशी त्यांजवर बुधबृहस्पतींनीं कृपा केली तशी तुह्मां आह्मांवर करोत. ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

---

**टीप.**— चालत्या काळांत मनुष्य संपत्तीच्या मदानें गरीबगुरीबाची कीव मनांत आणीत नाहींत, पण दैववशात् विपत्तिकाल प्राप्त झाला आणि दरिद्रांजन पोंचूं लागतांच जे लोकर सावध होतात व

२५ मराठी ३७०१.

आपलें आचरण सुधरतात, त्यांस ईश्वर लौकर सत्फल देतो, आणि ज्यांना सावध होण्याला उशीर लागतो, त्यांना फळ मिळण्याला ही उशीरच लागतो हा प्रकार या कथेंत दर्शविला आहे. हें व्रत श्रावणमाहात्म्यांत आहे.

---

## शुक्रवाराची कहाणी.

ऐका शुक्रवारा तुझी कहाणी, आटपाट नगर होतं, तिथं एक राजा होता. त्या राजाला कांहीं मुलगा नवता, तेव्हां त्याच्या राणीनं काय केलें? एका सुईणीला बोलावून आणलं, आणि तिला सांगितलं, अग अग सुईणी, मला जर नाळवारीसुद्धां एक मुलगा गुपचीप आणून देशील तर मी तुला पुष्कळ द्रव्य देईन, तेव्हां सुइणीनें ही गोष्ट कबूल केली, व ती त्या तपासावर राहिली, गावांत एक गरीब ब्राह्मणाची बाई गर्भार राहिली, तेव्हां ही सुईण तिच्या घरीं गेली, आणि तिला सांगूं लागली कीं, बाई बाई तूं गरीब आहेस, मला तुझी फार दया येते, जेव्हां तुझं बाळंतपणाचं पोट दुखावयास लागेल तेव्हां मला कळवावं, मी येऊन तुझं बाळंतपण फुकट करीन. बाई बिचारी भोळी होती, तिनं होय ह्मणून सांगितलं, नंतर ती सुईण राणीकडे आली, आणि सांगूं लागली, बाईसाहेब बाईसाहेब, आपल्या नगरांत एक अमुक अमुक गरीब ब्राह्मणाची बाई गरोदर आहे, तिला नुकताच दुसरा महिना लागला आहे, लक्षणें सर्व मुलाचींच दिसताहेत. तेव्हां आपल्या घरापासून तों तेथपर्यंत कोणास कांहीं कळणार नाहीं असें एक गुप्त भुयार तयार करावं, आपल्यास कांहीं दिवस गेल्याची अफवा उठवावी, मी तुह्मांस

नाळवारीचा मुलगा आणून देईन. असें ऐकल्याबरोबर राणीला मोठा आनंद झाला, आणि जसजसे दिवस होत गेले त्याप्रमाणें डोहोळ्यांचें डंभ केलें. पोट मोठें दिसण्या-करितां त्याच्यावर लुगड्यांच्या घड्या बांधल्या, भुयार त-यार केलें, नऊ मास भरतांच बाळंतपणाची तयारी केली, इकडे ब्राह्मणीण बाईचं पोट दुखूं लागलं, सुइणीला बो-लावूं आलं, त्याबरोबर तुह्मी पुढें व्हा, मी येतें ह्मणून सां-गितलं, धांवत धांवत राणीकडे आली, पोट दुखण्याचं ढोंग करूं सांगितलं, नंतर ब्राह्मणाच्या घरीं आली, बाई बाई तुझी आहे पाहिली खेप, डोळे बांधलेस तर भिणार नाहींस, नाहीं बांधलेस तर भय वाटेल, असं सांगून तिचे डोळे बांधले, ती बाळंतीण झाली, मुलगा झाला, सुइणीनें एक्या दासीकडून भुयाराच्या वाटेनं मुलगा राणीकडे पा-ठविला, व तिनें एक वरवंटा घेऊन त्यास एक कुंचा बां-धला, आणि तिच्या पुढें ठेविला, मग बाईचे डोळे सो-डले, तुला वरवंटाच झाला असें सांगूं लागली, बाई बि-चारी काय करिते? तिनें नशिबाला बोट लावलं, मनामध्यें दुःखी झाली, सुईण तेथून निघून राजवाड्यांत गेली, राणीसाहेब बाळंतीण झाल्याची बातमी पसरली, मुलाचें कोडकौतुक होऊं लागलें. इकडे ब्राह्मणबाईनें नेम धरला, श्रावणमासीं दर शुक्रवारीं जिवतीची पूजा करावी, आणि नमस्कार करून ह्मणावें कीं, जय जिवती आई माते, जिथं माझं बाळ असेल, तिथं खुशाल असो, असें ह्मणून तिनं तांदूळ उडवावे, ते ह्या मुलाच्या डोक्यावर पडावे, हिरवें लुगडें नेसणं, हिरव्या बांगड्या लेणं वर्ज करून कारलीच्या मांडवाखालून जाणं वर्ज केलं, तांदुळांचं धूण वलांडणं बंद

करून. याप्रमाणें ती नेहमीं वागूं लागली. इकडे राजपुत्र मोठा झाल्यावर एके दिवशीं तो बाहेर फिरावयास निघाला, त्या दिवशीं ही न्हाऊन आपल्या अंगण्यांत राळे वाळत घातलेले राखीत बसली होती, तेव्हां ह्याची नजर तिजवर गेली, हा मोहित झाला, व रात्रीं हिची भेट घ्यावयाची ह्मणून निश्चय केला, रात्रीं हिच्या घरीं आला, दारांत गाय वासरूं बांधलीं होतीं, चालतां चालतां राजाचा पाय वासराच्या शेंपुटावर पडला, वासराला वाचा फुटली तें आपल्या आईस ह्मणालें, कोण्या पाप्यानें माझ्या शेपुटावर पाय दिला ? तेव्हां ती ह्मणाली, जो आपल्या आईकडे जावयास भीत नाहीं, तो तुझ्या शेंपटावर पाय देण्यास भिईल काय ? हें ऐकून राजा मागें परतला आणि घरीं येऊन आपल्या आईपासून काशीस जाण्याची परवानगी घेतली, काशीस जाऊं लागला जातां जातां एका ब्राह्मणाच्या येथें उतरला. त्या ब्राह्मणाला आपलीं पुष्कळ मुलं होत होतीं, पण तीं आपलीं पांचवीसहावीच्या दिवशीं जात असत. ज्या दिवशीं राजा आला, त्या दिवशीं चमत्कार काय झाला; पांचवीचा दिवस होता, राजा दारांत निजला होता, सटवी रात्रीं आली, आणि ह्मणूं लागली, कोण ग मेलं वाटेंत पसरलं आहे; इतक्यांत जिवती उत्तर करिते, अग अग माझं तें नवसाचं बाळ निजलं आहे, मी कांहीं त्याला वलांडून जाऊं देणार नाहीं, मुलगा आज जाणार ह्मणून, त्या मुलाचीं आइबापें चिंता करीत बसलीं होतीं, त्यांनीं हा सगळा संवाद ऐकला, इतक्यांत उत्तर रात्र झाल्यावर सटवी व जिवती ह्या दोघी आपआपल्या रस्त्यांनीं निघून गेल्या. इकडे उजाडल्यावर ब्राह्मणानें येऊन राजाचे पाय धरले व

तुमच्या मुळें आमचा मुलगा जगला असें ह्मणून आजचे दिवस मुकाम करा अशी विनंती केली, राजानें ती मान्य केली त्याही रात्रीं याच प्रमाणें प्रकार झाला, दुसरे दिवशीं राजा चालता झाला, इकडे ह्यांचा मुलगा वाढता झाला. पुढें काशींत गेल्यावर यात्रा केली, गयावर्जनाची वेळ आली, पिंड देतेवेळ ते घेण्याला दोन हात वर आले, असें होण्याचें कारण त्यानें ब्राह्मणांस विचारलें, ते ह्मणाले, घरीं जा, साऱ्या गांवातल्या बायकापुरूषांस जेवावयास बोलाव, ह्मणजे याचें कारण समजेल. मनाला मोठी चुटपुट लागली, घरीं आला मोठ्या थाटाचं मांवदें केलं, त्या दिवशीं शुक्रवार होता; गावांत सक्त ताकीद दिली, घरीं कोणी चूल पेटवूं नये, सगळ्यांनीं जेवाला यावं? इकडे ब्राह्मणिणीला मोठं संकट पडलं, तिनं राजाला निरोप धाडला, मला जिवतीचं व्रत आहे. माझे नेम पुष्कळ आहेत तें पाळाल तर जेवाला येईन, राजानें कबूल केलें. जेथें तांदुळांचं धूण होतं तें काढवून तेथें सारवून त्यावरून ती आली, हिरव्याबांगड्या भरल्या नाहींत, कारल्याच्या मांडवाखालून ही गेली नाहीं. दरवेळेस जेथें माझं बाळ असेल तेथें खुशाल असो, असें ह्मणे पुढें पानं जिकडे तिकडे वाढलीं आहेत, मोठा थाट जमला आहे, इतक्यांत राजानें तूप वाढण्यास स्वत: घेतलं, वाढतां वाढतां ही ज्या पंक्तींत बसली होती, तेथें आला, तूप वाढूं लागला, ईश्वरी नियमाप्रमाणें चमत्कार झाला, बाईस प्रेम सुटून पान्हा फुटला, तिच्या स्तनांतून दुधाच्या धारा फुटल्या त्या ह्याच्या तोंडांत उडाल्या, तो हातची तपेली ठेवून रूसून निजला, तो कांहीं केल्या उठेना, तेव्हां आई गेली आणि त्याची समजूत करूं लागली, त्या वेळीं

तो ह्मणाला असें होण्याचें कारण काय? तिनें सांगितलें कीं, ती तुझी खरी आई. व मी तुझी मानलेली आई. असें सांगून सर्व हकीकत सांगितली, नंतर भोजनाचा समारंभ झाला, पुढें त्यानें आपल्या आईबापांस राजवाड्यानजीक मोठा वाडा बांधून देऊन त्यांसुद्धां आपण राज्य करूं लागला. तर जशी जिवती तिला प्रसन्न झाली, तशी तुह्मां आह्मां होवो. ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

---

टीप—ही कथा श्रावणमाहात्म्यांत आहे; ह्यांतील तात्पर्य फार चांगलें आहे, किती जरी श्रीमंत असला, कसा जरी बंदोबस्त ठेवला. तरी लबाडी उघडकीस आल्यावांचून राहत नाहीं. ईश्वर खऱ्याचा वाली आहे.

---

## शनिवार.

### ( कहाणी मारुतीची. )

आट पाट नगर होतं, तिथं एक गरीब ब्राह्मण होता, त्याला एक सून होती, एक मुलगा होता, मुलगा प्रवासाला गेला होता, सासूसासरा देवाला जात असत. भिक्षा मागून धान्य आणीत असत, सून घरांत बसून सैंपाक करून ठेवीत असे, सासूसासऱ्यांला वाढीत असे, उरलंसुरलं आपण खात असे. असं होतांहोतां, श्रावण मास आला, संपतशनिवार आला, तसा संपतशनिवारीं आपला एक मुलगा आला, बाई बाई मला न्हाऊं घाल, माखूं घाल, बाबा घरामधें तेल नाहीं, तुला न्हाऊं कशानें घालूं? माझ्या पुरतं घागरींत असेल, थोडं शेंडीला लावून न्हाऊं घाल, जेऊं घाल, घागरींत हात घालून तेल काढलं, त्याला

न्हाऊं घालून जेऊं घातलं, उरलंसुरलं आपण खाल्लं. असे चार शनिवार झाले, चवथे शनिवारीं त्या मुलानें तांदूळ मागून जाते वेळीं घरभर तांदूळ फेंकून अदृश्य झाला, इकडे घराचा वाडा झाला, गोठाभर गुरं झालीं, धान्याच्या कोठ्या भरल्या दासी वटकींनीं घर भरलं, सासू सासरा देवाहून आलीं, तों घर कांहीं ओळखेना. हा वाडा कोणाचा? सून दारांत आरती घेऊन पुढें आली, मामंजी मासूबाई इकडे या. अग तूं कोणाच्या घरांत राहिली आहेत? तिनें सर्व हकीकत सांगितली, शनिवारीं एक मुलगा आला, बाई बाई मला न्हाऊं घाल, माखूं घाल, बाबा घरामधें तेल नाहीं, तुला न्हाऊं कशानें घालूं? माझ्या पुरतं घागरींत असेल, थोडं शेंडीला लावून न्हाऊं घाल, जेऊं घाल, घागरींत हात घालून तेल काढलं, त्याला न्हाऊं घालून जेऊं घातलं, उरलंसुरलं आपण खाल्लं. असे चार शनिवार झाले, चवथे शनिवारीं त्या मुलानें तांदूळ मागून जातेवेळीं घरभर तांदूळ फेंकून अदृश्य झाला, इकडे मोठा वाडा झाला, तुह्मी चुकाल ह्मणून मी दारांत उभी राहिलें, असें ह्मणून त्यांना आरती केली. सर्व जण घरांत गेलीं. त्यांना जसा मारुती प्रसन्न झाला तसा तुह्मां आह्मां होवो.

---

टीप— गरीबींत देखील अनुकूलतेप्रमाणें परोपकार करावा म्हणजे ती गोष्ट ईश्वरास मान्य होऊन त्यास त्याचें सत्फल मिळतें.

---

## पांचां देवांची कहाणी.

ऐका पांची देवांनो तुमची कहाणी. एके दिवशीं ईश्वरपार्वती पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास निघाले, मुक्कामीं उतरले पार्वती पादसेवा करूं लागली, तिचे हात कठीण लागले.

तिला एका गरीब ब्राह्मणाच्या बायकोचें बाळंतपण करूं सांगितलें, तुझे हात कमळासारखे मऊ होतील असें सांगितलें, पुढें पार्वतीनें ब्राह्मणाच्या बायकोचें बाळंतपण केलें ती फार उतराई झाली, पार्वतीला ह्मणाली, तूं माझी मायबहीण आहेस, मला कांहीं वाण सांग, वसा सांग, तिनें वसा सांगितला, काय सांगितला ? चातुर्मास्य आला, आखाडी दशमी आली, ह्मणजे गणपतीची पूजा करावी, दूर्वा वहाव्या, मोदकाचा नैवेद्य दाखवावा, वर तुपाची धार धरावी, आणि कार्तिक्या दशमीस ब्राह्मण जेवावयास सांगून आपल्या वशाचं उद्यापन करावं. याचप्रमाणें विष्णूचं पूजन करावं तुळशीपत्र वहावं, खिरीचा नैवेद्य दाखवावा, वर तुपाची धार धरावी. आणि कार्तिकांत ब्राह्मण सांगून उद्यापन करावं. तसंच नंदीस स्नान घालावं. आघाड्याचं पान वहावं, खिचडीचा नैवेद्य दाखवावा, वर तुपाची धार धरावी, ब्राह्मण सांगून उद्यापन करावें. असंच महादेवास स्नान घालावं, बेलाचीं पानें वहावीं, दहींभाताचा नैवेद्य दाखवावा, वर तुपाची धार धरावी, आणि ब्राह्मण जेवूं घालून उद्यापन करावं, तसंच पार्वतीस स्नान घालावं, पांढरीं फुलं वहावीं, घारापुरीचा नैवेद्य दाखवावा, आणि कार्तिकांत ब्राह्मण जेऊं सांगून उद्यापन करावं. हा वसा कधीं घ्यावा ? अखाड्या दशमीस घ्यावा. कार्तिक्या पौर्णिमेस संपूर्ण करावा. असा तिला वसा सांगितला, आपण अदृश्य झाली, बरेच दिवस झाले, इकडे पार्वतीनें काय केलें ? गरीबीचा वेष घेतला; त्या बाईला भेटायला गेली. तिनें हिला ओळखलं नाहीं, पार्वतीला राग आला, गणपतीकडे गेली, सगळी हकीकत सांगितली, तो उतली

आहे. मातली आहे, तिचें वैभव काढून टाक. ही गोष्ट मजपासून घडायची नाहीं. ती कांहीं उताची नाहीं, माताची नाहीं, तिनें माझी चार महिने पूजा केली, दूर्वा वाहिल्या, मोदकाचा नैवेद्य दाखविला, वर तुपाची धार धरली आहे. मी कांहीं तिचं वैभव काढणार नाहीं. असं गणपतीनें ह्मटल्यावर विष्णुकडे गेली सगळी हकीकत सांगीतली. ती उतली आहे, मातली आहे, तिचें वैभव काढून टाक. ही गोष्ट मजकडून घडायची नाहीं. ती कांहीं उताची नाहीं, माताची नाहीं, तिनें माझी चार महिने पूजा केली. तुळसीपत्र वाहिलें. खिरीचा नैवेद्य दाखविला. वर तुपाची धार धरली आहे. मी कांहीं तिचें वैभव काढणार नाहीं. तेथून उठली, नंदीकडे गेली, सगळी हकीकत सांगीतली. ती उतली आहे, मातली आहे, तिचें वैभव काढून टाक. ही गोष्ट मजकडून घडायची नाहीं. ती कांहीं उताची नाहीं, माताची नाहीं, तिनें माझी चार महिने पूजा केली. आघाड्याचें पान वाहिलं, खिचडीचा नैवेद्य दाखविला, वर तुपाची धार धरली आहे. मी कांहीं तिचें वैभव काढणार नाहीं, तेथून उठली, महादेवाकडे गेली सगळी, हकीकत सांगितली. ती उतली आहे, मातली आहे, तिचें वैभव काढून टाक. ही गोष्ट मजपासून घडायची नाहीं. ती कांहीं उताची नाहीं, माताची नाहीं. तिनें माझी चार महिनें पूजा केली, बेलाचीं पानं वाहिलीं, दहींभाताचा नैवेद्य दाखविला, वर तुपाची धार धरली आहे. मी कांहीं तिचें वैभव काढणार नाहीं. तूं गरीबीच्या वेषानें गेलीस ह्मणून तुला ओळखलं नाहीं. पहिल्या वेषानें जा, ह्मणजे तुला ओळखील. मग श्रीमंती वेषानें पार्वती पुन्हा गेली,

बसाला पाट दिला, पाय धरून अभारी झाली, तिला पार्वती प्रसन्न झाली, उत्तम आशीर्वाद दिला, जसे तिला पांची देव प्रसन्न झाले, तसे तुह्मां आह्मां होवोत. ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

---

**टीप**– आपण जर सदाचरणानें वागत असलों व ईश्वराची भक्ति करीत असलों तर आपणास कोणापासून ही भीति नाहीं. आपलें कोणी वाईट करणार नाहीं. ही गोष्ट ह्या कथेंत दर्शविली आहे.

---

## कहाणी धरित्रीची.

ऐका परमेश्वरा धरित्रीमाय तुझी कहाणी, आट पाट नगर होतं, नगरांत एक ब्राह्मण होता, त्या ब्राह्मणाची स्त्री काय करी ? धरित्रिमायेचं चिंतन करी, वंदन करी, धरित्रिमाय तूंच थोर, तूंच समर्थ, कांकणलेल्या लेकी दे, मुसळकांड्या दासी दे, नारायणासारखे पांच पुत्र दे, दोघी कन्या दे, कुसुंबीच्या फुला सारखं स्थळ दे, हा वसा कधीं घ्यावा ? आखाड्या दशमीस घ्यावा, कार्तिक्या दशमीस संपूर्ण करावा, किंवा श्रावणीं तृतीयेला घ्यावा, माघीं तृतीयेला संपूर्ण करावा. सहा रेघांचा चंद्र काढावा, सहा रेघांचा सूर्य काढावा, सहा गाईचीं पावलं काढावीं व त्यांची रोज पूजा करावी. संपूर्णाला काय करावं ? वाढाघरची सून जेऊं सांगावी, कोरा करा, पांढरा दोरा, चोळीपोळीचं वाण द्यावं. आणि आपल्या वशाचं उद्यापन करावं. ही धरित्रिमायेची कहाणी साठा उत्तरांची पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

---

## गोपद्मांची कहाणी.

ऐका, गोपद्मांनो तुमची कहाणी. स्वर्गलोकीं कोणे एके वेळीं, इंद्रसभा, चंद्रसभा, कौरवसभा, पांडवसभा, इत्यादिक पांची सभा बसल्या आहेत, ताशे मर्फे वाजत आहेत, रंभा नाचताहेत, तों तंबुऱ्याच्या तारा तुटल्या, तशा मृदुंगाच्या भेऱ्या फुटल्या. असें झाल्यावर सभेचा हुकूम झाला कीं, करा रे हांकारा, पिटारे दांडोरा, गांवांत कोणी वाणवशावांचून असेल, त्याच्या पाठीचा तीन बोटें कंकर काढून आणा. तंबोऱ्यास तारा लावा, कीर्तन चालू करा, रंभा नाचत्या करा, असा हुकूम झाल्यावर कृष्णदेव आपल्या मनांत भ्याले कीं, माझी बहीण सुभद्रा हिनें कांहीं वाणवसा केला नसेल, तेव्हां ते उठले, आणि तिजकडे जाऊन चौकशी करितात, तों तिनें कांहींच वाणवसा केला नाहीं, नंतर तिला कृष्णानें हा वसा सांगितला; कीं, सुभद्रे सुभद्रे, आखाड्या दशमीपासून तीसतीन गोपद्में देवाच्या द्वारीं काढावींत, तितकींच ब्राह्मणाचे द्वारीं, पिंपळाचे पारीं, तळ्याचे पाळीं, व गाईचे गोठ्यांत काढून पूजा करावी. हा नियम कार्तिक्या दशमीस संपूर्ण करावा. याप्रमाणें पांच वर्षं करावें, उद्यापनाचे वेळीं कुवारणीस जेवावयांस बोलवावी, पहिल्या वर्षीं विडा द्यावा, दुसऱ्या वर्षीं चुडा भरावा, तिसऱ्या वर्षीं केळ्यांचा फणा द्यावा, चौथ्या वर्षीं उंसाची मोळी द्यावी, आणि पांचवे वर्षीं चोळीपरकर नेसवून आपल्या वशाचें उद्यापन करावें. असें सांगून कृष्ण पूर्व ठिकाणीं येऊन बसले. नंतर लागलेच सुभद्रेनें सांगितल्याप्रमाणें केलें. पुढें सभेंत कळलें कीं, सुभद्रा वाणवशाशिवाय आहे. असें समजल्यावर तिकडे दूत जाऊन पहातात

तों हिनें वसा केला आहे. पुढें, येतां येतां गांवाबाहेर हत्तीण एक बाणवशाशिवाय ह्यांस दिसली. ती दक्षिणेस पाय, उत्तरेस डोकें, करून निजलेली होती, तेव्हां तिच्या पाठीचा कंकर काढून नेला. नंतर तंबूऱ्याच्या तारा जोडल्या, मुदुंगाच्या भेऱ्या वाजत्या केल्या, तशाच रंभा नाचत्या केल्या, तात्पर्य काय ? कीं, जसें ह्या व्रताचे योगानें सुभद्रेवरचें संकट टळलें तसें तुमचें आमचें टळो. ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं देवा ब्राह्मणाचे द्वारीं सुफळ संपूर्ण.

---

**टीप** - हा गोपद्मांचा वसा स्त्रिया ऋतुप्राप्ति झाल्यानंतर त्या वर्षापासून पांच वर्षे घेतात. हा गोपद्माचा ( गाईच्या पावलांचा ) एक तांब्याचा किंवा जस्ताचा ठसा असतो. त्यांत राधाकृष्ण, गणपति, चंद्र, सूर्य, शंख, चक्र, गदा, पद्म, नंदी, महादेव, स्वस्तिक, तुळस, बेल, व आपटा ह्यांचीं झाडें, गाय, गोऱ्हा, पादुका, व श्रीराम जयराम जयजय राम हा मंत्र इत्यादिक असून चौकटीबाहेर एक हत्तीण असते. त्या ठशांत तांदुळांचें पीठ एक मोती व एक पोंवळें आणि हळद ह्यांचें चूर्ण एकत्र कालवून रांगोळीच्या ठशाप्रमाणें तो ठसा सारवलेल्या जागेवर उठवितात; किंवा कोणी हातानें काढतात. आणि त्याची पूजा करून ही कहाणी म्हणतात. हें व्रत भविष्योत्तरपुराणांत आहे.

---

## शिळासप्तमीची कहाणी.

आटपाट नगर होतं, तिथं एक राजा होता, त्यानें एक गांव वसवला, जवळ एक तळं बांधलं, कांहीं केल्या पाणी लागेना, जलदेवतांची प्रार्थना केली, त्या राजाला प्रसन्न झाल्या, राजा राजा, तुझ्या सुनेचा वडील मुलगा बळी देशील तर पाणी लागेल, हें राजानें ऐकलं, घरीं आला, मनीं विचार केला, फार दुःखी झाला, पुष्कळ लोकांच्या

जिवापेक्षां नातवाचा जीव अधीक नाहीं, पण ही गोष्ट घडते कशी? सून कबूल होईल कशी? तशी त्यानें तोड काढली, सुनेला माहेरीं पाठवावी, मुलगा ठेवून घ्यावा, सासऱ्यानें आज्ञा केली, सून निघून माहेरी गेली, इकडे राजानें चांगला दिवस पाहिला. मुलाला न्हाऊं माखूं घातलं, जेऊं खाऊं घातलं, दागदागिने अंगावर घातले, आणि एका पलंगावर निजवून तो पलंग तळ्यांत नेऊन ठेविला, जलदेवता प्रसन्न झाल्या; तळ्याला महामूर पाणी आलं; पुढें राजाची सून माहेराहून येऊं लागली, भावाला बरोबर घेतलं, मामंजींनीं बांधलेलं तळं आलं, पाण्यानें भरलेलं पाहिलं, तिथं तिला श्रावण शुद्ध सप्तमी पडली, वशाची आठवण झाली, तो वसा काय? तळ्याच्या पाळीं जावं, त्याची पूजा करावी, कांकडीचं पान घ्यावं, वर दहींभात आणि लोणचं घालावं, एक शिवराई सुपारी ठेवावी, आणि भावाला वाण द्यावं, एक मुटकळं तळ्यांत टाकावं, आणि जलदेवतांची प्रार्थना करावी कीं, "जय देवी आई माते, आमचे वंशीं कोणीं पाण्यांत बुडाले असतील ते आह्मांस परत मिळोत" अशी प्रार्थना करावी, याप्रमाणं तळ्यांत उभं राहून हिनं त्या दिवशीं केल्यावर, बळी दिलेला मुलगा पाय ओढूं लागला, पाय कोण ओढतं? ह्मणून ही पाहूं लागली, तों आपला मुलगा दृष्टीस पडला, तिनं कडेवर घेतला, आश्चर्य करूं लागली, सासऱ्यांला येऊं लागली, राजाला कळलं, सून आपल्या वडील मुलासुद्धां येत आहे, राजास आश्चर्य वाटलें, त्यानें तिचे पाय धरले, तिला विचारलें अग अग मुली, तुझा मुलगा आह्मी बळी दिला, तो परत कसा आला? मी शिळा सप्तमीचा वसा केला,

तळ्यांत वाण दिलं, जलदेवतांची प्रार्थना केली, मूल पुढें आलं, तसं उचलून कडेवर घेतलं. हें ऐकून राजास फार आनंद झाला, आणि तिजवर अधिक ममता करूं लागला, तर जशा तिला जलदेवता प्रसन्न झाल्या तशा तुह्मां आह्मां होवोत. ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं देवा ब्राह्मणाचे द्वारीं सुफळ संपूर्ण.

---

**टीप**– परोपकारासारखें पुण्य नाहीं, चांगला मनुष्य मोठ्या परोपकाराकरितां आपल्या संपत्तीवरच काय पण आपल्या अत्यंत प्रिय अशा मुलांबाळांच्या जीवितावर देखील उदार होतो. अखेरीस ईश्वर त्याचें कल्याण करितो. हा प्रकार या कथेंत स्पष्ट दर्शविला आहे.

---

## नाग पंचमीची कहाणी.

ऐका नागोबा देवा तुमची कहाणी. आट पाट नगर होतं, तिथें एक ब्राह्मण होता, त्या ब्राह्मणाला पांच सात सुना होत्या. चातुर्मास्यांत श्रावणमास आला आहे, नागपंचमीचा दिवस आहे, कोणी आपल्या आजोळीं, कोणी पंजोळीं, कोणी माहेरीं, अशा सर्व सुना गेल्या आहेत. सर्वांत धाकटी सून होती, तिच्या माहेरचं कोणीच नव्हतं; तेव्हां ती जरा खिन्न झाली, व मनांत माझा सर्व संबंधी नागोबा देव आहे, असें समजून, नागोबा मला माहेराहून न्यावयास येईल. असं ह्मणूं लागली, इतक्यांत काय झालें? शेषशाई भगवानास तिची करुणा आली, त्यानें ब्राह्मणाचा वेष घेतला, व ह्या मुलीस नेण्याकरितां आला. ब्राह्मण विचारांत पडला, हा इतके दिवस कोठें लपून राहिला? व आतांच कोठून आला? पुढें त्यानें मुलीला विचारलें तिनेंही हाच माझा मामा असं सांगितलं, ब्राह्मणानें तिची रवा-

नगी केली, पुढें त्या वेषधारी मामानें तिला आपल्या वारु-ळापर्यंत नेलें. नंतर खरी हकीगत सर्व तिला सांगितली, आणि फणीवर बसवून आपल्या बिळांत घेऊन गेला. आपल्या बायकामुलांनां ताकीद दिली, कीं हिला कोणी चाऊं नका, पुढें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं त्याची बायको बाळंत होऊं लागली, तेव्हां हिच्या हातांत दिवा धरावयास सांगितला, पुढें ती सर्पीण व्याली, तिचीं पिलें वळवळ करूं लागलीं, ही मुलगी भिऊन गेली, हातांतला दिवा खालीं पडला, पोरांची शेंपूट भाजली, सर्पीण रा-गावली, सर्व हकीकत नवऱ्याला सांगितली, तो ह्मणाला तिला लौकरच सासरीं पोंचवूं, पुढें ते पूर्ववत् आनंदानें वागूं लागले, एके दिवशीं मुलीस अपार संपत्ति दिली, आपण मनुष्यदेह धारण करून, तिला सासरीं पावती केली, ह्या गोष्टीला बरेच दिवस झाले, नागाचीं पोरें मोठीं झालीं, आपल्या आईपाशीं चौकशी केली, आमची शेंपूट कशानें तुटली? तिनें मुलीची गोष्ट सांगितली, त्यांस फार राग आला, तिचा सूड घ्यावा ह्मणून ते हिच्या घरीं आले, तो नागपंचमीचा दिवस आहे, हिनें आपली पुष्कळ वेळ भा-वांची वाट पाहिली आहे, परंतु ते येत नाहींत, ह्मणून पाटावर व भिंतीवर नागांचीं चित्रें काढलीं आहेत. त्यांची पूजा केली आहे, जवळ नागाणे, लाह्या दूध वगैरे ठेविलें आहे, उकडीचा नैवेद्य दाखविला आहे; हा सर्व प्रकार नागाचीं पिलें पहात आहेत, सरते शेवटीं तिनें देवाची प्रार्थना केली, कीं जय नागोबा देवा, जेथें माझे भाऊ लां-डोबा पुंडोबा असतील तेथें खुशाल असोत, असें ह्मणून नमस्कार केला, इकडे सर्व प्रकार ह्यांनीं पाहून मनांतील

सर्व राग घालविला, मनांत तिजविषयीं दया आली, पुढें त्या दिवशीं तेथें वस्ती केली, पहाटेस जेथें दूध व पाणी ठेवतात त्यांत एक नवरत्नांचा हार ठेवून आपण निघून गेले. दुसऱ्या दिवशीं हें दृष्टीस पडलें, हार उचलून गळ्यांत घातला, तर जसा तिला नागोबा प्रसन्न झाला, तसा तुह्मां आह्मांला होवो, ही सांठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

टीप.—नकळत आपल्या पासून एखाद्याचें अनहित झालें आणि आपलें जर त्याजवर प्रेम असलें तर त्याच्यापासून आपणास अपाय होत नाहीं. हें या कथेंत दाखविलें आहे. दुसरें ज्याचा कोणी नाहीं त्याचा वाली परमेश्वर आहे. त्याची भक्ति केल्यास परमेश्वरास भक्ताचे हेतु पुरवावे लागतात हेंही दर्शविलें आहे. हा व्रतविधि प्रभासखंडांत आहे.

## दिव्यांच्या आमावास्येची कहाणी.

ऐका दीपकांनो तुमची कहाणी, आट पाट नगर होतं, तिथं एक राजा होता, त्याला एक सून होती, तिनें एके दिवशीं घरांतला पदार्थ स्वतः खाल्ला आणि उंदरावरती आळ घातला, आपल्यावरचा प्रमाद टाळला, इकडे उंदरांनीं विचार केला, कीं हा आपल्यावर उगाच आळ आला आहे. तेव्हां आपण हिचा सूड घ्यावा, ह्मणून सर्वांनीं विचार केला, रात्रीं हिची चोळी पाहुण्याच्या अंथरुणांत नेऊन टाकिली, दुसरे दिवशीं हिची फजीती झाली, सासूदिरांनीं निंदा केली, घरांतून तिला घालवून दिली, हिचा रोजचा नेम असे, रोज दिवे घांसावे, तेलवात करावी, स्वतः लावावेत; खडीसाखरेनें त्यांच्या जोती साराव्या दिव्यांच्या अमावास्येचे दिवशीं त्यांस चांगला नैवेद्य दाख-

वावा, त्याप्रमाणें ही घरांतून निघाल्यावर बंद पडले, पुढें ह्या अमावास्येच्या दिवशीं राजा शिकारीहून येत होता एका झाडाखालीं मुकामास उतरला, तेथें ह्याच्या दृष्टीस एक चमत्कार पडला, आपले सर्व गावांतले दिवे अदृश्य रूप धारण करून झाडावर येऊन बसले आहेत, एकमेकांपाशीं गोष्टी करीत आहेत, कीं कोणाचे घरीं जेवावयास काय केलें होतें? कशी कशी पूजा मिळाली, वगैरे चौकशी चालली आहे, सर्वत्रांनीं आपआपल्या घरीं घडलेली हकीकत यथासांग सांगितली, त्यांच्या मागून राजाच्या घरचा दिवा सांगूं लागला, बाबांनो, काय सांगूं, यंदा मजसारखा हत-भागी कोणी नाहीं कीं, मी दरवर्षीं सर्व दिव्यांत मुख्य असावयाचा. माझा थाट माट जास्ती व्हावयाचा, त्यास यंदा अशा विपत्तींत दिवस काढावे लागत आहेत, इतकें ह्मटल्यावर त्यास सर्व दीपकांनीं विचारलें, असें होण्याचें कारण काय? मग तो सांगूं लागला, बाबांनो काय सांगूं, मी ह्या गांवच्या राजाच्या घरचा दिवा, त्याची एक सून होती, तिनें एके दिवशीं घरांतला पदार्थ स्वत: खाल्ला, आणि उंदरांवरती आळ घातला, आपल्यावरचा प्रमाद टाळला, इकडे उंदरांनीं विचार केला, कीं हा आपल्यावर उगाच आळ आला आहे, तेव्हां आपण हिचा सूड घ्यावा, ह्मणून सर्वांनीं विचार केला, रात्रीं हिची चोळी पाहुण्याच्या आंथरूणांत नेऊन टाकिली, दुसरे दिवशीं हिची फजीती झाली, सासूदिरांनीं निंदा केली, घरांतून तिला घाल-वून दिली, ह्मणून मला हे दिवस आले, ती दरवर्षास माझी मनोभावें पूजा करीत असे, जेथें असेल तेथें खुशाल असो. असें ह्मणून तिला आशीर्वाद दिला, सदरहू घडलेला

प्रकार राजानें श्रवण केला, आपल्या सुनेचा अपराध नाहीं, अशी त्याची खात्री झाली, घरीं आला, कोणी प्रत्यक्ष पाहिलें आहे काय? ह्मणून चौकशी केली, तिला मेणा पाठवून आणली, झाल्या गोष्टीची क्षमा मागितली, साऱ्या घरांत मुखत्यारी दिली, सुखानें राज्यकाम करूं लागली, तर जसा तिला दीपक पावला आणि तिच्यावरला आळ टळला, तसा तुमचा आमचा टळो. ही सांठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

**टीप**—क्षुद्र प्राण्यांनाहीं जर आपण विनाकारण त्रास दिला तर ते देखील आपला मोठा घात करितात इतक्याकरितां आपण कोणास दुःख देऊं नये, व आपल्या हातून घडलेल्या अपराधाचा आळ दुसऱ्यावर घालूं नये. हें स्पष्ट दर्शविलें आहे आणि कोणाचें ही आपण चांगलें केलें असलें तर तें फुकट जातें. ही नीति या कथेंत दर्शविली आहे.

## विष्णूची कहाणी.

ऐक परमेश्वरा, महाविष्णु. तुमची कहाणी, काशीपूर नगर, सुवर्णाचा वड, भद्रकाळी गंगा, नव नाडी, बावन आड, तेथें एक सप्तक्या ब्राह्मण तप करीत आहे, काय करतो? सकाळीं उठतो, स्नान संध्या करतो, विभूतीचें लेपन करितो, तिवोटी लंगोटी घालतो. खांदीं कुऱ्हाड घेतो, वनास जातो, वनचीं फळें आणतो, त्यांचा उत्तम पाक करतो. त्याचे पांच भाग करितो. देवाचा देवास देतो, अतीथाचा अतिथास देतो, ब्राह्मणाचा ब्राह्मणास देतो, गाईचा गाईस देतो, उरलेंसुरलें आपण खातो. असें करतां नखं रूपलीं, बोटं खुपलीं, आंगीं रोम वाढिनले मस्तकीं जटा वाढिनल्या. अठ्यायशींसहस्र वर्षें तपास

भरलीं. एवढें तप कोणाकारणें करतो, महाविष्णु भेटावा याकारणें करतो. कपोत कपोती एक्या वृक्षावर बसलीं होतीं, तीं त्याला विचारूं लागलीं, भल्या ब्राह्मणा, जपी ब्राह्मणा, तपी ब्राह्मणा, माळी ब्राह्मणा, चरणीं तर चालतोस, मुखींतर वदतोस, एवढे तप कोणाकारणें करतोस, महाविष्णु भेटावा याकारणें करतों. शेषशयनीं सुवर्णमंचकीं, महाविष्णू निजले होते, तेथें येऊन कपोत कपोती सांगूं लागलीं कीं, काशीपूर नगर, सुवर्ण वड, भद्रकाळी गंगा, नव नाडी, बावन आड, तेथें एक सत्तक्या ब्राह्मण तप करीत आहे, काय करतो? सकाळीं उठतो स्नानसंध्या करतो, विभूतीचें लेदन करितो, तिवोटी लंगोटी घालतो, खांदीं कुऱ्हाड घेतो, वनास जातो, वनचीं फळें आणतो, त्याचा उत्तम पाक करतो, त्याचे पांच भाग करतो देवाचा देवास देतो, अतीथाचा अतिथास देतो, ब्राह्मणाचा ब्राह्मणास देतो, गाईचा गाईस देतो, उरलेंसुरलें आपण खातो. असें करतां नखं रुपलीं, बोटं खुपलीं, आंगीं रोम वाढिनले, मस्तकीं जटा वाढिनल्या. अठ्यायशींसहस्र वर्षें तपास भरलीं. एवढें तप कोणाकारणें करतो, महाविष्णु भेटावा याकारणें करतो. महाविष्णु वरं ह्मणाले. झटकर उठले, पांई पावा घातल्या, मस्तकीं पीतांबर गुंडाळला, ब्राह्मणाजवळ जाऊन उभे राहिले. भल्या ब्राह्मणा, जपी ब्राह्मणा, तपी ब्राह्मणा, माळी ब्राह्मणा, चरणीं तर चालतोस, मुखीं तर वदतोस, एवढें तप कोणाकारणें करतोस, महाविष्णू भेटावा याकारणें करतों. तेव्हां महाविष्णु तो मीच, कशानें भेटावा, कशानें ओळखावा, असाच भेटेन असाच ओळखेन, शंख चक्र गदा पद्म, पीतांबरधारी,

अयोध्याचारी, माघारीं वळला, तर महाविष्णूची मूर्त झाली. भल्यारे भक्ता, शरणागता. राज्य माग, भांडार माग, संसारींचं सुख माग, राज्य नको, भांडार नको, संसारींचं सुख नको, तुझंमाझं एक असन, तुझीमाझी एक शेज, तुझीमाझी एक स्तुति, कुठें करावी देवद्वारीं, भल्याब्राह्मणाच्या आश्रमीं, असें त्याला एकरूप केलं. महाविष्णूची कहाणी ऐकती, त्यांचीं किल्मिष पातकें हरती, नित्यकहाणी करती त्यांना होय विष्णुलोक प्राप्ती.

---

टीप.—ही कहाणी तुळशीची पूजा झाल्यावर तुळशीपाशीं किंवा घरच्या देवापाशीं बायका म्हणत असतात.

श्री लक्ष्मीनारायण वाचनालय

नंबर १४

# वीरेंद्रसिंह.

ही लहानशी कादंबरी मूळ हिंदी

पुस्तकाच्या आधारें

अनंत केशव चितळे वांईकर

यांनीं लिहिली ती

वांई येथें मोदवृत्त छापखान्यांत

छापिली.

किंमत दोन आणे

हें पुस्तक रजिस्टर करून सर्व हक्क स्वाधीन
ठेविले आहेत.

# प्रस्तावना

पुढील छोटेखानी कादंबरी मूळ हिंदी भाषेंत पुरोहित गोपीनाथ एम्. ए. जयपूर राजवकील यांनीं इंग्रजी कथानकाच्या आधारें लिहिलेल्या वीरेंद्र नामक कादंबरीच्या आधारें आह्मीं मराठी भाषेंत रूपांतरानें उतरिली आहे. यांत शृंगार आणि वीर या मुख्य रसांचेंच उत्तम प्रकारें परिपोषण केलें असल्यामुळें हें कल्पित कथानक वाचकांचें बरेंच मनोरंजन करील अशी आशा आहे. अस्तु. हें पुस्तक मराठी भाषेंत उतरण्याची श्रीयुत खेमराज श्रीकृष्णदास यांनीं मोठ्या उदार बुद्धीनें आह्मास परवानगी दिली, याबद्दल त्यांचे आभार मानून ही लहानशी प्रस्तावना पुरी करितों.

तीर्थराज ( प्रयाग. )
२६–७–९९.

पुस्तककर्ता.

॥ दोर्दण्डद्वयकुण्डलीकृतलसत्कोदण्डचण्डांशुग- ॥
॥ ध्वस्तोद्दण्डविपक्षमण्डलमथ त्वां वीक्ष्य मध्येरणम् ।
॥ वल्गद्गाण्डिवमुक्तकाण्डवलय ज्वालावली ताण्डव- ।
॥ भ्रश्यत्खाण्डव रुष्टपाण्डवमहो को नः क्षितीशः स्मरेत्
॥ १ ॥

# वीरेंद्रसिंह.

## भाग पहिला.

शरयूनदीच्या सुंदर तटाकावर भव्यप्रतापशाली सुलेमान बादशाहाच्या छावणीचा तळ पडला होता. सूर्यनारायणाच्या दीप्तिमान प्रकाशानें त्यांच्या अनेक तंबूवरील सोन्याचे कळस चकाकत होते. सुवर्णमय ध्वजा आणि पताका आपल्या अंगच्या तेजानें प्रेक्षकांच्या नेत्रांस दिपवून टाकीत होत्या. छावणीची रचना समचतुर्भुज केलेली असून, तिच्या एका कोपऱ्यावर बादशाहाचा ज्येष्ठ पुत्र शहाजादा मुराद याचा तंबू उभा होता. दुसऱ्या कोपऱ्यावर मुरादाचा धाकटा भाऊ, अर्थात बादशाहाचा कनिष्ठ पुत्र शहाजादा खुसरू याचा तंबू होता. तिसऱ्या कोपऱ्यावर सेनाध्यक्ष मिर्झा दिलेरजंग याचा तंबू होता; आणि चवथ्या कोपऱ्यावर बादशाहाच्या जनानखान्याचा तंबू होता. सर्वांच्या मध्यभागीं राजराजेश्वर बादशाहा सुलेमान याचा भव्य तंबू असून, त्याच्या सभोंवतीं दुसरे अनेक तंबू उभे होते. सुमारें दहा मैलांच्या परिघांत जिकडे तिकडे डेरे, राहुट्या, आणि शामियानें यांचा जणूं बाजार भरला आहे, असें

दिसत होतें तो सर्व देखावा अवलोकन करितांच प्रेक्षकांस असें वाटे कीं, ही वनभूमि आज जणूं काय एखाद्या सुंदर नगरीचेंच रूप धारण करून बसली आहे. छावणींत कोणीं कोणत्याही तऱ्हेची गडबड करूं नये अशी सक्त ताकीद असल्यामुळें पहारेवाल्यांच्या मंद मंद पदसंचारध्वनीखेरीज दुसरा कसलाही ध्वनि कर्णगोचर होत नव्हता. सूर्यकिरणांच्या प्रकाशानें तेथील वीरांचीं रत्नजडित शिरोवेष्टनें, पदकं, कवचें, आणि नवीनच पाजळून तयार केलेलीं शस्त्रें इतकीं चकाकत होतीं कीं, त्यांवर पाहणाराची दृष्टि क्षणभर देखील स्थिर राहूं शकत नव्हती.

बादशहा सुलेमान आपल्या तंबूंत सुंदर आसनावर बसून भावी संग्रामासंबंधानें विचार करीत असतां, स्वर्णवेत्र धारण करणाऱ्या एका सेवकानें आंत येऊन, अत्यंत विनयपूर्वक सांजलि होऊन, त्यास वर्दी दिली कीं, “ जहांपनाह, शत्रूकडून एक जवान बुवा कांहीं निरोप घेऊन आला असून तो हुजूरच्या समोर येऊन भाषण करण्याची परवानगी मागत आहे. ” बादशाहा ह्मणाला “ शिष्टाईस आलेल्या राजदूताचा सन्मान करणें हरप्रसंगीं अत्यंत अवश्य आहे. त्याला त्वरित मजसमोर घेऊन ये. ” बादशाहाच्या मुखांतून आज्ञाक्षरें बाहेर पडतांच चोपदार बाहेर गेला, आणि त्या तरुण

राजदूतास बरोबर घेऊन पुन्हा बादशाहाच्या तंबूंत परत आला. तंबूंत शिरतेवेळीं दूतानें आपल्या स्वतांच्या सेवकांस बाहेरच राहण्याचा संकेत करून तो आंत शिरला, आणि यथोचित रीतीनें बादशहास सलाम करून सन्मुख उभा राहिला. बादशाहानें त्या नवीन आलेल्या दूताकडे लक्ष्यपूर्वक अवलोकन करून व त्याच्या सौंदर्याची आपल्या मनांत प्रशंसा करून त्याच्याशीं बोलण्यास सुरुवात केली. तो त्यास ह्मणाला, " आपलें नांव काय ? " तरुण दूत ह्मणाला " माझें नांव वीरेंद्रसिंह " त्यावर बादशहा ह्मणाला " आपण येथें कोणत्या हेतूनें आलां आहां ? " तरुण दूतानें उत्तर दिलें, " चक्रवर्ति महाराज मानसिंह यांनीं मजला आपणांकडे संधि करण्याकरितां पाठविलें आहे. महाराजांना पक्कपणीं ठाऊक आहे कीं, आपल्या सेनेपेक्षां मुसलमानांची सेना फारच थोडी आहे. याशिवाय ते हेंही पूर्णपणें जाणून आहेत कीं, रजपुतांची स्वाभाविक वीरता, आणि युद्धकौशल्य या दोन गोष्टींमुळें ते अशिक्षित मुसलमानांचा खात्रीनें पराभव करूं शकतील. परंतु, या निरर्थक संग्रामांत आपल्या प्रिय प्रजेचें रुधिर विनाकारण वाहविण्याची महाराजांची इच्छा नाहीं; आणि ह्मणूनच त्यांनीं मला आपणांकडे संधि करण्याकरितां पाठविलें आहे."

बादशाहानें हें त्या दूताचें भाषण श्रवण करून मोठ्या गंभीर स्वरानें ह्मटलें " अहो तरुण राजदूत, तुमचा हा विचार अगदीं अयोग्य आहे. कारण, आमची ताबेदारी कबूल न करितां, जो कोणी तहाचें बोलणें लावण्याकरितां दूताकरवीं निरोप पाठविण्याची हिंमत बांधितो, त्याचें ह्मणणें सुलेमान बादशाहाच्या परिस्थितीकडे पाहतां केवळ तुच्छतेनेंच श्रवण करण्यास योग्य आहे."

हें सुलेमान बादशहाचें दिमाखाचें भाषण श्रवण करून रजपूत युवक ह्मणाला, " माझ्या निरोपांपेक्षां आपलें सेना घेऊन या देशावर चढाई करून येणें, अधिकतर धाष्ट्याचें असल्यामुळें तेंच तुच्छतेनें अवलोकन करण्यास योग्य आहे. " बादशाहा सुलेमान संक्रुद्ध होऊन ह्मणाला, " चित्ताला मोह पाडण्याजोगें असलें हें तारुण्य जर तुझ्या ठिकाणीं नसतें तर असल्या अनुचित आणि पचनी न पडणाऱ्या तहाच्या भाषणानें आणि उद्धट वर्तनानें जरूर तूं आपल्या प्राणांस आंचवला असतास. जा, नीघ येथून, आणि आपल्या धन्याला सांग कीं, आपल्या शत्रूला मारावें कीं वांचवावें ही गोष्ट सुलेमान बादशाहा उत्तम प्रकारें जाणत आहे. तुला मी यावेळीं माफी देत आहे. परंतु, त्याला ( तुझ्या माल-

काला ) शृंखलांनीं बद्ध करून माझ्या राज्यांत ओढून नेल्याशिवाय सोडणार नाहीं. आमच्या छावणीचा पडाव सोडून बाहेर गेल्यावर तूंही आपल्या जिवास निर्भय आणि सुरक्षित समजूं नको. आमच्या साथीदारांपैकीं जर कोणाशीं तुझी गांठ पडली तर त्याजबरोबर मोठ्या सावधगिरीचें वर्तन ठेव; कारण, त्यानें जर तुला पकडून कैद करून माझ्या समोर आणिलें, तर तुझें शिर सलामत राहणें अशक्य आहे."

बादशाहाचें भाषण ऐकतांच वीरेंद्र क्रोधानें तांबडा लाल झाला; आणि तो त्वेषानें कांहीं तरी दुरुत्तर बोलणार इतक्यांत, बादशाहाची निर्दयता आणि दूताची तरुणावस्था यांजवर दृष्टि देऊन करुणायुक्त होत्साता एक वजीर पुढें सरला, व त्यानें वीरेंद्राचा हात धरून त्यास बादशहाचे समोरून दूर ओढिलें; आणि तंबूच्या द्वारासन्निध नेऊन तो ह्मणाला, "अप्रबुद्ध तरुण दूता, या क्रूर व्याघ्राच्या गुहेंत शिरून त्याच्या मिशा उपटण्याची बुद्धि तुला कोठून सुचली!" वीरेंद्रानें निर्भयपणें उत्तर दिलें. "बादशाहानें आज माझा अशा तऱ्हेनें मानभंग केला आहे कीं, कोणत्याही रजपूत तरुणानें तसा मानभंग आणि तिरस्कार सहन केला नसेल. परमेश्वर साक्ष आहे मी या गोष्टीचा सूड उगविल्यावांचून कधींही राहणार नाहीं."

# भाग दुसरा.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें प्रतिज्ञेचें भाषण करून वीरेंद्रसिंह सुलेमानशहाच्या छावणींतून बाहेर पडला, आणि आपल्या बरोबर आणिलेल्या थोड्याशा सैन्यासह मार्गक्रमण करावयास लागला. त्यावेळीं तो आपल्या साथीदारांस ह्मणाला, " गडहो, आतां तुह्मीं सुलेमानशहाबरोबर युद्ध करण्याची सुरुवातच झाली आहे, असें समजा. आतां या मार्गांत आह्मांला कोणतेंही मुसलमानी सैन्य भेटलें, आणि तें कितीही मोठें असलें तरी आह्मी त्याच्याशीं युद्ध केल्याशिवाय राहणार नाहीं. " रजपूत वीरांनीं हें त्या वीरश्रेष्ठ सरदाराचें ह्मणणं मोठ्या खुषीनें मान्य केलें, आणि मुसलमानी सैन्याची गांठ पडण्याच्या आकांक्षेनें सावधानतापूर्वक ते मार्ग क्रमूं लागले. अदमासें चार मैलांचा मार्ग क्रमून ते गेले असतील अगर नसतील, इतक्यांत एक शिपाई मोठ्यानें ओरडून ह्मणाला " शत्रू ! शत्रू ! " वीरेंद्रसिंहानें घोड्याचा लगाम ओढून धरून दूरवर दृष्टि देऊन पाहिलें तों शरयूनदीचें दुसरें तीर शत्रुसैन्यानें वेष्टिलेलें आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. आपल्यापेक्षां शत्रुसेनेची संख्या जास्त आहे, ही गोष्ट माहीत असतांनाही त्यानें आपल्या साथीदारांस उत्तेजन देऊन ह्मटलें,

" मित्रहो, शिकार आयती तुमच्यासमोर चालून आली आहे, अशा वेळीं पिच्छेहाट करणें ह्मणजे आपल्या वीरमातांच्या दुधास लाजविणें आणि क्षत्रिय-कुलास कलंकित करणें आहे ! " हें त्याचें वीरोचित भाषण श्रवण करितांच सर्व रजपूत वीर सुसज्जित झाले, आणि त्यांनीं आपलीं शस्त्रें सांवरून घोड्यांना टांच देऊन मोठ्या त्वेषानें शत्रूवर हल्ला केला. तेव्हां थोड-क्याच वेळांत शरयूचें जल रक्तमय होऊन गेलें, आणि तें सुंदर तटस्थल भयानक रणक्षेत्र बनलें. रजपूत लोकांहून मुसलमानांची संख्या दुपटीनें अधिक असतांही आपल्या अंगच्या अतुल वीरतेच्या जोरावर रजपुतांनीं जय मिळविला, आणि मुसलमानांची वाताहत झाली. कित्येक तर रजपुतांच्या हातीं लागून कैदी बनले. या युद्धांत विशेष महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे सुलेमान सुलतानाची पुत्री शहाजादी माहरू वीरेंद्रसिंहाच्या हातीं सांपडली, ही होय.

शत्रूच्या हातीं सांपडल्यामुळें भयचकित झालेल्या राजकुमारीकडे अवलोकन करून तो राजपुत्र युवक वीरेंद्रसिंह ह्मणाला, " हे शुभांगि, भिऊं नकोस; तूं दयाशील शत्रूच्या हातीं पडली आहेस; " त्यावर शहाजादी माहरूनें उत्तर दिलें, " वीरेंद्रसिंह, मी सुले-मानशहाची कन्या—माहरू आहें असें समज;

आणि —" माहरू हें नांव ऐकतांच वीरेंद्र अचंबित झाला. कारण, त्यानें त्यावेळीं अखिल भूमंडळावर पसरलेली शहाजादी माहरूच्या रूप लावण्याची कीर्ति अनेक वेळ ऐकिली होती. ही शहाजादी त्यावेळच्या सुंदर स्त्रियांत अग्रगण्य समजली जात असे. असलें तें सुंदर रत्न परमेश्वरानें वीरेंद्रसिंहाच्या हातीं अचानक आणून सोडलें!

या अलौकिक स्त्रीरत्नलाभाचें काय करावें, यासंबंधानें वीरेंद्रास मोठा विचार पडला. त्यानें पुष्कळ वेळपर्यंत आपल्या मनाशीं विचार केला; आणि असें ठरविलें कीं, हिजला आपल्या सर्व रजपूतसेनेचे अधिपति महाराज अमरसिंह यांच्याकडे घेऊन जावें; म्हणजे ते महाराजाधिराज मानसिंग यांच्या संमतीनें जें उचित वाटेल तें करतील. वीरेंद्राचा हा विचार माहरू इजला कळल्यावर ती त्यास म्हणाली," तरुण वीरेंद्रा, तुझ्या या उत्तम स्वभावावरून मला असें वाटतें कीं, तुझा मालक देखील असाच चांगल्या स्वभावाचा असेल आणि माझा पिता मजला सोडवून नेईपर्यंत त्याचे हातून मजला कोणत्याही तऱ्हेची तकलीफ पोंचणार नाहीं." शहाजादीचें भाषण श्रवण करून वीरेंद्रानें तिजला उत्तमप्रकारें वागविण्याचें आश्वासन दिलें आणि आपलें सैन्य घेऊन तो अमरसिंहाच्या भेटीस जावयास निघाला.

मार्गांत वीरेंद्राचें उत्तम आचरण पाहून शहाजादी त्याजवर फारच प्रसन्न झाली, आणि तिनें आपल्या तोंडावरील बुरखा दूर सारिला. वाचकहो, काय झालें बरें ? काळ्याकुट्ट अंधेऱ्या रात्रींत पूर्णचंद्राचा प्रकाश पडला ! सौंदर्याच्या असह्य छबीनें प्रथमतः वीरेंद्राचे नेत्र दिपून गेले; परंतु, दुसऱ्यांदा जेव्हां त्यानें नेत्र उघडून तिजकडे पाहिलें, तेव्हां त्याची दृष्टि जशीच्या तशी स्तब्ध होऊन राहिली. माहरूचे रूपाची वीरेंद्राला जी कल्पना होती तिच्या शतपटीनें जास्त असें रूप पाहून तो आश्चर्यचकित झाला. माहरूच्या मुखास चंद्राची उपमा देण्यांतही कवींची चूक झाली असें ह्मणावें लागेल ! कारण, चंद्राच्या उपमेपासून शहाजादीस यत्किंचितूही फायदा न होतां उलट चंद्रालाच नसतें मोठेपण येणारें होतें.

वीरेंद्र महारूच्या रूपाकडे पहात तटस्थ उभा राहिला होता. पापणी आपलें काम करीत होती किंवा नाहीं हें सांगतां येत नव्हतें. माहरूच्या सौंदर्यानें वीरेंद्राचे मनावर जो परिणाम घडला तो वर्णितां येणं कठीण आहे. असो. कांहीं वेळ वाट चालून वीरेंद्र आपल्या लोकांसह अमरसिंहाच्या समीप येऊन पोहोंचला. तेथें जातांच त्यानें आपल्या संधिसदेशाच्या असफलतेची सर्व हकीकत त्यास निवे-

दन करून मार्गातील युद्धाचें वर्तमानही सांगितलें. त्यावर अमरसिंह ह्मणाला, " या संपूर्ण रजपूत सेनेचे अधिपति राजराजेश्वर मानसिंह हे आहेत. सबब, हा सर्व वृत्तांत त्यांना विदित होणें अवश्य आहे, व हें काम तुह्मीं स्वतःच करावें हें श्रेयस्कर आहे. तुह्मी परत येईपर्यंत शहाजादीस कोणत्याही प्रकारें तकलीफ होऊं देणार नाहीं. " वीरेंद्रानें ती गोष्ट मान्य केली, आणि एक तासानंतर तो मानसिंहाकडे जावयास निघाला.

या एक तासाच्या अवसरांत वीरेंद्रानें शहाजादीच्या डेऱ्यांत जाऊन हें सर्व वर्तमान तिजला विदित केलें. माहरूनें यावेळींही आपल्या सुशील रक्षणकर्त्यासमोर आपल्या मुखावरील बुरखा दूर केला, आणि वीरेंद्रानें त्या अथाग लावण्यसरितेंत कामानुरागाची व आशेची बुचकळी मारिली !

## भाग तिसरा.

मागील भागांत, क्षत्रियवीर वीरेंद्रसिंह शहाजादी माहरूला भेटून मानसिंहाकडे जावयास निघाला, तेथ-

पर्यंतची हकीकत सांगितली. आतां या भागांत पुढील हकीकत वाचकांस निवेदन करावयाची आहे.

कांहींवेळपर्यंत मार्गक्रमण करून वीरेंद्र राजाधिराज मानसिंह याचे संनिध जाऊन पोहोंचला; आणि त्याचे संमुख उभा राहून त्यानें सर्व वृत्तांत त्याजला संक्षेपानें निवेदन केला. तो चमत्कारिक वृत्तांत श्रवण करून महाराज मानसिंहानें दीर्घ निश्वास सोडून ह्मटलें, " आतां तर लढाईवांचून गत्यंतरच नाहीं. 'हरिच्छा बलीयसी ' वीरेंद्रा, तो सुलेमान आहे तरी कसा ? " वीरेंद्रानें उत्तर दिलें, " सुलेमान सिंहासारखा पराक्रमी आहे. हा आपला शुभचिंतक दास जर श्रीमानांच्या ( आपल्या ) सेवेंत नसतां, तर सुलेमानशहावांचून अन्य मनुष्याची पराधीनता कधींही न स्वीकारता. " हें ऐकून महाराज मानसिंहानें आपल्या जवळच्या वृद्ध मंत्रिजनांची सल्ला घेऊन ह्मटलें, " ठीक आहे, एक तासानंतर तुह्मी येथून परत जाण्याची तयारी करा. महाराज अमरसिंहजी यांजला आमचें या संबंधाचें आज्ञापत्र आपले बरोबरच देण्यांत येईल. " अशाप्रकारचें भाषण झाल्यावर मानसिंहानें अत्यंत सत्कारपूर्वक वीरेंद्राची पाठवणी केली.

चोवीस तासपर्यंत एकसारखी वाट चालून वीरेंद्र पुन्हां अमरसिंहाच्या सेवेस हजर जाहला. वीरेंद्रानें

दिलेलें मानसिंहाचें आज्ञापत्र अमरसिंह लक्ष्यपूर्वक वाचूं लागला; परंतु, पत्रांतील मजकूर वाचतांच त्याचें तोंड पांढरें फट्ट झालें; आणि त्याचें सर्वांग भयानें थरारूं लागलें. क्षणभर विचार करून त्यानें तें पत्र वीरेंद्राचे अंगावर टाकिलें. वीरेंद्र एवढा वेळपावेतों मुकाट्यानें अमरसिंहाचे मुखाकडे टक लावून पहात होता. इतक्यांत अमरसिंहानें तें पत्र आपलेकडे टाकलेलें पाहून तो भीति आणि संदेह यांनीं युक्त होत्साता तें पत्र हातीं घेऊन वाचूं लागला, त्यांत पुढें लिहिलेला मजकूर होता.

" आमचे परम मित्र आणि साह्यकारी यांनीं कैद करून आणिलेल्या शाहजादी माहरूच्या संबंधानें पुढील प्रमाणें व्यवस्था करावी. सर्व क्षत्रियवीरांच्या हितार्थ संग्राम न होणेंच अत्यंत इष्ट होतें. परंतु, रुधिरपिपासार्थी सुलेमानाला ती गोष्ट मानवत नाहीं; याकरितां आह्मांलाही अवसरानुसार वर्तन करणें अवश्य आहे. याकरितां माहरूला तिच्या पित्याच्या उत्तम वर्तनाबद्दल जामीन अर्थात् ओलीस समजून त्याजकडे तहाचा निरोप पाठवा, आणि त्याजकडून जर कांहीं अत्याचाराचें वर्तन घडलें तर लागलींच माहरूचें मस्तक धडापासून वेगळें करा ! मुसलमान जर कोणत्याही प्रकारें तह करण्यास राजी नाहींच, तर अशा प्रसंगीं

आह्मींही नम्रता धारण करणें सर्वथा अनुचित आहे. इतक्यांत एका दूतानें धांवत येऊन वर्दी दिली कीं, "आपल्या सेनेच्या बिनींवरील लोकांस सुलेमानशहानें वेढा दिला आहे, आणि आपली कन्या आपणास सर्वथा अंतरली असें समजून त्यानें आमच्या सैन्याची एकसहा कत्तल करण्याचा हुकूम केला आहे." वाचकहो, हा अशुभ समाचार श्रवण करून तर वीरेंद्राचें संतप्त हृदय अधिकतर विदीर्ण झालें. ह्यावेळीं अमरसिंह आणि वीरेंद्रसिंह यांचा पुढें लिहिल्याप्रमाणें संवाद झाला.

**अमरसिंहः**—वीरेंद्रा, मी परमेश्वराची शपथ घेऊन सांगतों कीं, महाराज मानसिंह यांच्या आज्ञेबरहुकूम वर्तन करण्याची मी प्रतिज्ञा करून चुकलों आहें. त्यांच्या आज्ञेचें पालन मजला सर्वथा विहित आहे.

**वीरेंद्रः**—(अमरसिंहाच्या पायां पडून रोदनस्वरानें) असें जरी आहे तरी महाराज मानसिंह यांची जर या कामीं दया करण्याबद्दल प्रार्थना केली तर ती सफल होण्याची आशा आहे.

**अमरसिंहः**—उठा! उठा! ही आज्ञा अनुल्लंघनीय आहे आणि या कामीं प्रार्थना करणें निरर्थक आहे.

**वीरेंद्रः**—सेनानाथ! मजला फक्त दोन दिवसांचा जरी अवसर मिळेल, तरी तेवढ्या वेळांत मी स्वतः जाऊन महाराज मानसिंह यांचे पुढें साष्टांग दंडवत घालीन,

आणि त्या निरपराध शहाजादीला न मारण्याबद्दलचा हुकूम आणीन.

**अमरसिंहः**— ही गोष्ट असंभवनीय आहे. ही गोष्ट सर्वथा असंभवनीय आहे. अशा प्रसंगीं महाराजांच्या विरुद्ध वर्तन करण्यापासून कोणतेंही अभीष्ट सिद्ध न होतां, उलट कांहीं तरी अनिष्ट प्राप्त होण्याचा संभव आहे. वीरेंद्रसिंह, माहरू जरी प्रत्यक्ष माझी मुलगी असली तरी देखील ती या प्रसंगीं मारली जाणार!

**वीरेंद्रः**— मारली जाणार! माहरू मारली जाणार ! हाय ! नाहीं ! असें होणार नाहीं ! तिच्याबद्दल मी आपला प्राण देईन. हे दयाळू स्वामी, असें ह्मणूं नका. त्या कोमलांगी माहरूच्या संबंधानें आपल्या मुखकमलापासून अशी अशिव वाणी कशी निघते कोण जाणे ! मजविषयीं जर ह्मणाल तर मृत्यु कल्पनामात्र आहे ! एक साधारण आणि तुच्छ घटना आहे! एक जगत् सोडून दुसऱ्या जगतांत जाण्याचें प्रस्थानपद आहे! परंतु, माहरूच्या—त्या मनोहर मूर्तीच्या—संबंधानें मृत्युशब्द केवळ विक्राळ रूपधारी महाभयानक पिशाच आहे असें वाटतें !

**अमरसिंहः**—( शांतपणें ) मजला कांहीं अन्य उपाय सुचत नाहीं.

**वीरेंद्रः**—या प्राणहारी आज्ञेच्या परिहारार्थ केवळ

एक युक्ति आहे. 'आपण असें प्रकट करा कीं, आपणा-कडे महाराजांची संदेशपत्रिका पोंचलीच नाहीं! आणि मी ह्मणतों कीं, मजपासून ती पत्रिका मार्गांत कोठें तरी गमावली.

**अमरसिंह**:–(त्या ठिकाणीं उभा राहून हें सर्व कृत्य पहात असलेल्या दूताकडे बोट दाखवून) आणि हा दूत जो आपल्या संभाषणाचा साक्षी आहे तो–

**वीरेंद्र**:–अहो, हा एक प्रतिष्ठित पुरुष आहे. हा आमचा कधींही विश्वासघात करणार नाहीं. (दूताकडे जाऊन) तुह्मी आमचें रहस्य प्रकट करूं नका. तुह्मी असें समजा कीं, ही गोष्ट तुह्माला समजलीच नाहीं. कां ? तुह्मी नाहींना असें करणार ? बोला बोला!

तो दूत या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या बेतांतच होता, इतक्यांत अमरसिंह ह्मणाला, "वीरेंद्र, मीं हें आज्ञा-पत्र पाहिलें आहे, आणि मी अवश्य त्याप्रमाणें वर्तन करणार. तुमचें निवारण करणें व्यर्थ आहे. मला माझें कर्तव्य बजाविलेंच पाहिजे. हें पत्र मजला झालेल्या राजाज्ञेचें प्रमाणपत्र आहे. ह्या पत्रांतील आज्ञा अशा प्रकारची आहे कीं, जिचें उल्लंघन मजकडून कदापि व्हावयाचें नाहीं."

**वीरेंद्र**:—(हातांतील पत्र उलगडून) काय ? आणि आपण याच आज्ञेप्रमाणें वर्तन करणार ? आणि

ह्याशिवाय दुसरें कांहींएक करणार नाहीं ? हें पत्र जर मीं आपणांस दिलेंच नसतें तर काय झालें असतें ?

**अमरसिंहः**—तर मग महारूचे प्राण वांचते, आणि तुह्मांस देहांत प्रायश्चित्त मिळालें असतें !

**वीरेंद्रः**--काय ? हें नष्ट नाहीं करितां यावयाचें ?

**अमरसिंहः**—नाहीं. हें माझ्या कर्तव्यकर्मास आधारभूत असणारें पत्र नीट जतन करून ठेविलें जाईल. कारण, पुढें मागें आधार दाखविण्यास हें आज्ञापत्र मजजवळ ठेविल्यावांचून असलें साहसाचें काम मी कदापि करणार नाहीं.

**वीरेंद्रः**—" तर मग याचा नाशच करून टाकितों. " असें गंभीर स्वरानें ह्मणून त्यानें त्या पत्राचे तुकडे तुकडे करून अग्नींत टाकिले. व तत्काळ तें घोर आज्ञादर्शक पत्र भस्मरूप होऊन गेलें.

अमरसिंहानें वीरेंद्राचा हात धरून क्रोधपूर्वक ह्मटलें, " अरे मूढा, काय हें दुष्कर्म केलेंस ? " वीरेंद्रानें गंभीरतेनें उत्तर दिलें, " आतां कांहीं आपल्या हातांत आज्ञापत्र राहिलें नाहीं. " असें झाल्यावर अमरसिंह संभ्रमयुक्त होत्साता आपल्या डेऱ्यांत इकडे तिकडे फिरला आणि थोडक्याच वेळांत दारावर येऊन त्यानें आपल्या शिपायांस हाक मारिली आणि लागलीच तो सर्व डेरा शिपायांनीं भरून गेला. वीरेंद्र ह्मणाला, " इतकी

गडबड कशाला करितां; मीच खुषीनें तुमचा बंदिवान होतों." अमरसिंहानें आपल्या शिपायांलाताकीद दिली कीं, "वीरेंद्रास फार सावधगिरीनें कैद करा, आणि हा जर सुटून गेला तर तुह्मी आपल्या जिवास सुरक्षित समजूं नका." अमरसिंहाच्या आज्ञेप्रमाणें शिपायांनीं मोठ्या बंदोबस्तानें वीरेंद्रास धरून नेऊन एका एकांतस्थानीं कैदेंत टाकिलें, आणि त्याजवर उत्तम प्रकारचा पहारा ठेविला.

---

## भाग चौथा.

*महाराज अमरसिंह यानें वीरेंद्राच्या अनुचित आचरणाची इत्थंभूत हकीकत तत्काल राजाधिराज मानसिंह यांस सांगून पाठविली होती. परंतु, मानसिंह त्यावेळीं मार्गक्रमण करीत असल्यामुळें ह्यासंबंधांत त्यांचा हुकूम येण्यास कांहीं दिवसांचा विलंब लागला. इकडे शहाजादी माहरू हिनें वीरेंद्राचा वृत्तांत श्रवण करून त्याच्या अत्युत्तम शीलसौजन्याची आपले ठिकाणीं अतिशय प्रशंसा केली. तथापि, वीरेंद्राच्या आणि आपल्या भावी दशेच्या संबंधानें तिचें हृदय फारच दुःखसंतप्त झालें. वीरेंद्रानें तिच्या रक्षणार्थ जें प्रशंसनीय*

कार्य केलें होतें, त्याबद्दल ती राजकुमारी प्रहरचे प्रहर विचार करीत बसूं लागली. आपल्यावर असा महान् उपकार करणाऱ्याचें आपल्या हातून काय हित-साधन केलें जाईल ह्याविषयीं ती आपल्या अंतःकरणास वारंवार प्रश्न करूं लागली. परंतु, त्या भोळ्या कुमारिकेला हें कळलें नाहीं कीं, हे सर्व मनोविकार तिच्या कामानुरागाचे आहेत!

वाचकहो, ज्या घोर संग्रामाकरितां मुसलमानी आणि रजपुती सेना एकत्र झाल्या आहेत, त्या संग्रामाची आज पहिली रात्र आहे. क्षत्रियसेनेचे मुख्य मुख्य अधिकारी एका विशाल रणतंबूंत जमले असून, तेथें मदिरापानाची अगदीं गर्दी उडाली आहे. सर्व लोक इतके आनंदमग्न झाले आहेत कीं, त्यांनीं हीं संग्रामाच्या प्रारंभाची ह्मणून अत्यंत उत्सवाची रात्र मानली आहे. मदिरापानानें उन्मत्त होऊन महाराज मानसिंहानें अमरसिंहास विचारिलें, “ तुमच्या तरुण बंदिवानाची काय अवस्था आहे ? ” त्यावर उत्तर आलें कीं, “ श्रीमान् त्याजला प्राणदंडाची शिक्षा देणार नाहींत अशी पूर्ण आशा आहे. तो एक उत्तम सेनापति आहे. आणि आमची अशी खात्री आहे कीं, तो जर कामार्त न होता, तर त्याजकडून असें वर्तन कदापि घडलें नसतें. ” त्यावर मानसिंह ह्मणाले “ आपलें

ह्मणणें अशाप्रकारचें आहे काय ? माझेही मनांत तसेंच कांहीं आहे; परंतु, या घोर संग्रामाच्या प्रसंगीं मी त्याजवर दया करण्यास असमर्थ आहें." अमरसिंह ह्मणाला, "हे महाराज, त्या तरुण सरदारावर दया करण्याविषयीं मी आपली हात जोडून विनंति करितों. तो एक मोठा पराक्रमी वीरपुरुष आहे आणि-" इतक्यांत तेथें असलेल्या सरदारांपैकीं एकजण ह्मणाला, "उद्यांच्या युद्धांत एखाद्या दुर्घट कामावर त्याची योजना करून त्याच्या वीरत्वाची आणि सत्यप्रतिज्ञतेची परीक्षा करणें श्रेयस्कर होईल." मानसिंह महाराजांस हें ह्मणणें पसंत पडून त्यांनीं वीरेंद्रास आपल्या संमुख आणून उभा करण्याची आज्ञा केली.

मानसिंहाच्या आज्ञेप्रमाणें सेवकांनीं वीरेंद्रास त्याचे संमुख उभें केलें. तेव्हां अमरसिंह ह्मणाला, "पहा बरें, राजद्रोही मनुष्याची अशी दशा होत असते." वीरेंद्र साष्टांग प्रणिपात करून ह्मणाला, "माझे तर आपणच संरक्षक आहांत." तें ऐकून महाराज मानसिंह ह्मणाले, "हे युवक, असें ह्मणूं नकोस. आह्मी सगळेच तुझ्या रक्षणार्थ तयार आहोंत." त्यानंतर माहरूच्या लाभाच्या आशेनें वीरेंद्र ह्मणाला, "मला जीवदान द्या, आणि त्याबद्दल श्रीमान् महाराजांच्या मनांत जें कार्य साधावयाचें असेल तें साध्य करण्याकरितां

माझी रवानगी करा. " त्यावर अमरसिंह मंदस्मित-पूर्वक बोलला, "या कामांत माहरूच्या भावी विपत्तीशीं संबंध नसावा. " वीरेंद्र ह्मणाला, " निःसंदेह हें ठीक आहे. माहरूच्या विपत्तीशिवाय कोणत्याही कार्या-विषयीं आज्ञा व्हावी. " महाराज मानसिंह ह्मणाले, " ठीक आहे, तशाच प्रकारची आज्ञा आहे. उद्यां सूर्योदय होतांच रजपूत सैन्याची आणि मुसलमानी सैन्याची प्रत्यक्ष भेट होईल. तूं आमची आज्ञा पालन करण्याची प्रतिज्ञा करून चुकलाच आहेस. तेव्हां तूं ही गोष्ट पूर्णपणें लक्ष्यांत वागविली पाहिजेस कीं, आमची आज्ञा यथोचितपणें पाळण्यावरच तुझे आणि माहरूचे प्राण निर्भय आहेत. " वीरेंद्रानें संभ्रमयुक्त वाणीनें उत्तर केलें ' महाराज, एकदां चटकन् आपली कोणती आज्ञा आहे, ती कळूं द्या. परमेश्वर साक्ष आहे. मीं जर आपल्या आज्ञेचा योग्य रीतीनें प्रतिपाळ केला नाहीं, तर तो परमेश्वर मला घोर यातनांचें दुःख भोगावयास लावो ! ' वीरेंद्राचें हें भाषण होतांच महाराज मानसिंह ह्मणाला, " तुजकडे एक फार महत्वाची कामगिरी सोंपविण्यांत आली आहे. तूं जर ती कामगिरी उत्तम प्रकारें शेवटास नेलीस, तर सुलेमानशाहाच्या सुकुमार कुमारीच्या मुखचंद्रानें तुला राजद्रोही बनविलें, असा जो तुजवर तुझे वैरी कलंक

लावीत आहेत, त्यापासून तू मुक्त होशील. उदईक या आर्यावर्तभूमींत महासंग्राम होईल. सर्व लोकांना माहीतच आहे कीं, मुसलमानांची विजयाशा केवळ सुलेमानशाहाच्या बुद्धिमत्तेवर अवलंबून आहे. अतएव युद्धाची सुरुवात होतांच तूं मोठ्या चपलतेनें सुलेमानाच्या जवळ जाऊन हरप्रयत्नानें आणि कौशल्यानें त्याचें मस्तक छेदन करून प्रेक्षक लोकांच्या विस्मयावसरांत त्वरित मजकडे घेऊन ये."

मानसिंहाच्या या आज्ञेनें ती समग्र राजसभा निस्तब्ध करून टाकिली. बादशाहाचें शिर छेदन करून वीरेंद्राचें जिवंतपणीं परत येणें असंभवनीय होतें. वीरेंद्राचें प्राणरक्षण होण्याची अमरसिंहाची सर्व आशा नष्ट झाली. वीरेंद्रही चित्रासारिखा उभा राहिला. परंतु, अखेर आपली शपथपूर्वक केलेली प्रतिज्ञा लक्ष्यांत आणून तेथील सर्व सभाजनांस त्यानें नम्रतापूर्वक प्रणाम केला, आणि तो त्वरित आपल्या डेऱ्यास निघून आला. या वेळीं त्याजबरोबर जामदाराचे शिपाई नसून तो एक स्वतंत्र सेनानी झाला होता.

## भाग पांचवा

आजचा दिवस अत्यंत कलुषित आणि भयानक असा उदय पावला आहे. मुसळधारेप्रमाणें पर्जन्याची

भयंकर वृष्टि होत आहे, आणि चहूंकडे अंधकाराचें साम्राज्य पसरलें आहे.

रजपुतांची सेना महाराज मानसिंह, अमरसिंह आदिकरून क्षत्रियवीरांच्या अधिपत्याखालीं सुसज्जित झाली आहे. मुसलमानी सेनेचा दक्षिणभाग शहाजादा मुराद याचे हाताखालीं असून डावीकडील भागावर शहाजादा खुषरू याचा अधिकार आहे; तसेंच त्यांच्या सनातन रीत्यनुसार सेनेच्या मध्यभागीं पातशहा सुले-मान स्वतां सुशोभित आहे.

उभयपक्षाकडील योद्धे यांनीं मोठ्या शौर्यानें युद्ध करण्यास सुरुवात केली; तेव्हां त्यांचा रणवेश अत्यंत अनिवार होऊन गेला. रजपूत वीर साहसानें मुसलमान लोकांवर हल्ला करीत, आणि मुसलमान वीरही केवळ आपला बचावच करून राहिले नाहींत, तर आपल्या अतुलित पराक्रमानें क्षत्रियांना भासवूं लागले कीं, क्षत्रिय वीराशिवाय या भूपृष्ठावर युद्धविद्याप्रवीण आणि रणधुरंधर अशी एक जाति वास्तव्य करीत आहे.

इतक्यांत काय चमत्कार झाला पहा ! एक तरुण क्षत्रिय वीर घोड्यावर बसून पवनवेगानें क्षत्रियसेनेंतून बाहेर पडला आणि अत्यंत प्रशंसनीय कुशलतेनें व परिश्रमानें तो ज्याठिकाणीं सुलेमानशहा उभा होता, त्याठिकाणीं येऊन पोहोंचला. सुलेमानशहाचे शरीर-

संरक्षक वीर त्याच संनिध उभे होतेच; परंतु, शहाच्या दुर्दैवानें त्यांची भलतीच समजूत झाली. वीरेंद्रसिंह त्या ठिकाणीं आलेला पहातांच त्यांना वाटलें कीं, तो पूर्वीप्रमाणें तहाचें बोलणें लावण्याकरितां आला असावा. असें झाल्यामुळें कोणत्याही प्रकारची आडकाठी न येतां, वीरेंद्र बादशाहाचे संमुख जाऊन उभा राहिला; आणि थोडे दिवसांपूर्वी बादशाहानें जो त्याचा तिरस्कार केला होता तो त्याचे हृदयांत अत्युग्र रूपानें प्रगट झालेला दिसला.

बादशाहाचा सूड घेण्याची त्यानें केलेली प्रतिज्ञा आणि मानसिंहासमोर वाहिलेली शपथ या दोन गोष्टींनीं वीरेंद्राचा आवेश अनावर होऊन सुलेमान–शहाचें मर्दन करण्याची त्याची इच्छा सहस्रपट वाढली. योग्य संधि मिळतांच त्यानें मोठ्या चपळतेनें आपल्या कमरेची तरवार काढून बादशहाच्या मानेवर एक भयंकर प्रहार केला; त्याबरोबर ज्याप्रमाणें इंद्रवज्राच्या आघातानें गिरिशिखर ढासळावें त्याप्रमाणें सुलेमानशाहा बेशुद्ध होऊन धाडकन् जमिनीवर कोसळला! त्याचे शरीरसंरक्षक वीर विस्मित होऊन चित्रासारिखे उभे राहिले. वीरेंद्रानें हें धाडसाचें कृत्य इतक्या शिताफीनें शेवटास नेलें होतें कीं, तेथील सर्व लोक किंकर्तव्यविमूढ होत्साते पाषाणमूर्तीप्रमाणें त्याचे तोंडाकडे

पहात उभे राहिले होते. कोणासही त्याला मारण्याची किंवा पकडण्याची हिंमत झाली नाहीं. आपला मनोरथ सिद्ध झालेला पाहून वीरेंद्रसिंह त्याच पावलीं तेथून निघाला आणि मोठ्या युक्तीनें त्या दुर्दमनीय मुसलमानी सेनेंतून एका केंसासही धक्का न लागतां आपल्या सैन्यांत परत आला. रणभूमीपासून सुमारें एक मैलावर माहरूचा तंबू होता. राजकुमारी प्रस्तुत युद्धाचा काय परिणाम होतो तो पाहण्याकरितां सचिंत मनानें रणभूमीकडे डोळे लावून बसली होती; कारण, तिचें जीवन किंवा मरण या युद्धावरच अवलंबून होतें. परंतु, त्या सुंदरीला स्वप्नांत देखील वीरेंद्राच्या साहसाची आणि तिजकरितां आचरिलेल्या दुष्कर्माची कल्पना आली नव्हती. त्यानें तर तिजकरितां आपलें शिरकमल हातावर घेऊन शत्रुसेनेच्या ऐन मध्यभागीं प्रवेश करून आपल्या प्रतिज्ञेच्या पूर्णतेनें कृतकृत्यता संपादिली होती. वीरेंद्राचें सुखदुःख व आपला इष्ट हेतु हिंदूलोकांच्या जयापजयावर अवलंबून आहे असें तिला वाटत होतें; परंतु, ही गोष्ट आह्मांला सांगणें अवश्य वाटतें कीं, ज्या ज्या वेळीं तिच्या हृदयांत वीरेंद्राची मूर्ति प्रकट होई त्या त्या वेळीं आपला पिता विजयी होण्याची इच्छा वस्तुतः आंतरिक होत नव्हती.

माहरू अशाप्रकारच्या विचारांत निमग्न असतां

अचानक एक घोडेस्वार दौडत येत असल्याचा ध्वनि कर्ण-गोचर झाला; आणि एक वीरपुरुष तंबूसमोर घोड्यावरून खालीं उतरला. माहरूनें वर तोंड करून पाहिलें तों तिचा प्रियकर वीरेंद्रसिंह तिजसमोर उभा असलेला दृष्टीस पडला.

**वीरेंद्रः**—( माहरूला मंदस्मितयुक्त पाहून ) हे सौंदर्यभूषिणि, ह्यावेळीं तर तूं मोठ्या आनंदानें माझें स्वागत करीत आहेस; परंतु, क्षणमात्रांत तूं मजला मोठ्या निष्ठुरतेनें येथून घालवून देण्यास उद्युक्त होशील.

**महारूः**—हें अशक्य आहे. तुमच्या मुळेंच माझे प्राण वांचले असल्यामुळें तशी गोष्ट होणें खरोखरच अशक्य आहे. व आपल्या अनेक उत्तम वर्तणुकीबद्दल मला आपले आभारी असलें पाहिजे.

**वीरेंद्रः**—( शोकाकुल होऊन मंद स्वरानें ) मीं तुझ्या प्राणांचें रक्षण केलें आहे खरें परंतु, त्या बरोबरच तुझ्या एका प्रियजनाच्या प्राणाचें हरणही केलें आहे.

**माहरूः**—तुह्मी रणमैदानांत युद्ध करीत असतां माझ्या एकाद्या नातलगाचा जरी प्राण घेतला असला; तरी--

**वीरेंद्रः**—होय मीं प्राण घेतला आहे आणि तो तुझ्या अत्यंत जवळच्या मनुष्याचा घेतला आहे.

**माहरूः**—कदाचित् माझ्या भावांपैकीं मुराद अगर खुषरू यांस मारिलें असेल तथापि, बरोबरीच्या युद्धांत —

वीरेंद्रः—(हातानें छाती बडवून) छे छे! वध्यप्राणी घातानें मरण पावला आहे. तुला काय सांगूं? एक भयंकर प्रतिज्ञा शेवटास नेण्याकरितां मी तें दुष्कर्म करण्यास सिद्ध झालों होतों!

माहरूः— कोण बरें तुमचा वध्य असावा!

वीरेंद्रः—तुझा पिता! महारू, राजाधिराज महावीरशाली तुझा पिता सुलेमानशाहा यावेळीं जिवंत नाहीं.

माहरूः— (गद्गद् स्वरानें) तर मग मला आतां कबरेशिवाय या जगांत राहण्याला दुसरें स्थान नाहीं.

अशाप्रकारचें भाषण चाललें असतां माहरूनें आपल्या कमरेस लटकणारी देदीप्यमान तरवार मेणांतून बाहेर काढून आपल्या छातींत अशा वेगानें मारून घेतली कीं, तें घोर कर्म करण्यास तिला प्रतिबंध करण्याला वीरेंद्रास अवसरच मिळाला नाहीं. तो तिचा निषेध करणार इतक्यांत स्वहस्तानें केलेल्या असह्य प्रहारानें व्याकूळ होऊन माहरू हा भूलोक सोडून चालती झाली.

तिकडे कंठगत प्राण झालेला सुलेमानशाहा आपल्या प्रतिज्ञेनें युद्धार्थी सैनिकांस उत्तेजन देत होता; व त्याच्या अपूर्व कौशल्यानें मुसलमानी सेनेला विजय प्राप्त झाला. हिंदू लोक सर्वतोपरी पराभूत होऊन महाराज मानसिंह, अमरसिंह आदिकरून क्षत्रियवीर

मुसलमानांचे बंदिवान् बनले. ते सुलेमानशाहासमोर येऊन उभे राहीपर्यंत त्यांना वीरेंद्रानें आपली प्रतिज्ञा शेवटास नेल्याचें माहीत देखील नव्हतें. बाहशहानें जरी धरून आणलेल्या क्षत्रिय वीरांचा वध करण्याची आज्ञा केली तरी त्याचा स्वतांचा प्राणांत समीप येऊन ठेपला होता, आणि खरोखरच मानसिंहादि क्षत्रिय वीर आणि सुलेमानशहा हे एकाच वेळीं परलोकीं गमन करिते झाले !

युद्ध समाप्त झाल्यावर कित्येक हिंदूलोकांनीं वीरेंद्राचें शव रणभूमीवर पडलेलें पाहिलें. बहुधा माहरूचा प्राणांत झालेला पाहून वीरेंद्र उन्मत्त होऊन विक्षिप्ताप्रमाणें तिच्या डेऱ्यांतून बाहेर येऊन त्या रणस्थळीं आला असावा, व तेथें कित्येक मुसलमानांशीं हटयुद्ध करीत असतां प्राणांस मुकला असावा !

याप्रमाणें ह्याठिकाणीं हें अद्भुत कथानक समाप्त झालें. मुसलमान इतिहासकारांनीं वीरेंद्रास जघन्यघातकी ह्मणून त्याचे नांवास कलंकित केलें आहे; परंतु, हिंदु लोकांत तो वीरश्रेष्ठ आणि जन्मभूमीचा खरा हितचिंतक ह्मणून समजला जात आहे.

समाप्त.

# भारतवर्षीय युवतिरत्नमाला.

यांत आपल्या भरतखंडांत अवतीर्ण झालेल्या इतिहासप्रसिद्ध वीस स्त्रियांचीं चरित्रें अत्यंत चटकदार भाषेंत लिहिलीं आहेत. प्रत्येक चरित्र वीर, करुण, आणि अद्भुत या मुख्य रसांनीं जणूं ओथंबलें आहे. कित्येक चरित्रांच्या वाचनानें मनावर इतका कांहीं विलक्षण परिणाम होतो कीं, तीं चरित्रें वाचीत असतां पदोपदीं वाचकाचें शरीर रोमांचित होत असतें असा अनुभव आला आहे. पुस्तक आबालवृद्धांनीं वाचण्यास योग्य झालें असून पातिव्रत्यादि सद्गुणांचा अंत:करणपटावर उत्तम प्रकारचा ठसा उमटविणारें आहे. पृष्ठसंख्या २५० जवळ असून बांधणी उत्तम सोनेरी अक्षरांची कापडी केलेली आहे, व पुस्तकाच्या चांगुलपणाबद्दल विद्वान् व रसिक लोकांचे उत्तम अभिप्राय मिळाले आहेत. किंमत १॥ रुपाया. ट. ह. शिवाय.

**अनंत केशव चितळे, वाईकर**

मोदवृत्त प्रेस—वांई

( जिल्हा—सातारा.)

# आमचीं छोटेखानी पुस्तकें.

**विजयादशमी**—या पुस्तकांत दसऱ्याच्या सणा-संबंधानें निबंधरूपानें फारच चटकदार भाषेंत विवेचन केलें आहे. किंमत १ आणा.

**स्मरणशक्ति कशी वाढवावी**—या पुस्तकांत स्मरणशक्तीच्या संवर्धनार्थ मोठ्या खुबीदार युक्त्या सुचविल्या आहेत. भाषा तर छानच आहे. किंमत १ आणा.

**सत्वप्रभाव अथवा भोजराजाचें स्वप्न**—यांत राजेलोकांच्या उपयोगीं असा उत्तम प्रकारचा उपदेश भरला असून तो स्वप्नरूपानें राजाच्या प्रत्ययास आणून दिला आहे. पुस्तक आबालवृद्धांनीं वाचण्यास योग्य आहे.

**राजा अलकेश**—पंचतंत्राच्या धर्तीचें कथानक मराठींत अत्यंत मनोहर भाषेंत उतरलें आहे. यांत अविचारी कृत्यांचे दुष्परिणाम फारच स्पष्टपणें दाखवून क्रुद्ध झालेल्या राजास त्याच्या चार प्रधानांनीं अन्यायाचरणापासून परावृत्त केलें आहे.

शेवटचीं दोन पुस्तकें खानापूर--बेळगांव, येथें धनंजय छापखान्याचे मालक द० गो० सडेकर यांचकडे मिळतील.

अनंत केशव चितळे,

वाईकर.